| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ५२ वा | शनिवार, दिनांक ०९ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी

## पाच आमदारांनी घेतली मंत्रिपदाची शपथ

**पुणे/प्रतिनिधी : पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक विजयानंतर भाजपा नेते सुवेंदू अधिकारी यांनी राज्याच्या मुख्यमंत्रीपदी शपथ घेतली. बंगालच्या राज्यपालांनी अधिकारी यांना शपथ दिली. बंगालमधील या भव्य शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजपा अध्यक्ष नितीन नबीन यांच्या उपस्थित हा थपधविधी सोहळा पार पडला. सुवेंदू अधिकारी यांच्यासह पाच आमदारांनी देखील मंत्रिपदाची शपथ घेतली.**



भव्य शपथविधी सोहळा कोलकाता येथील ब्रिगेड परेड मैदानावर हा शपथविधी सोहळा पार पडला. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, अभिनेते मिथून यांच्यासह इतर प्रमुख नेतेही उपस्थित होते. राज्यपालांनी त्यांना शपथ दिली. सुवेंदू अधिकाऱ्यांनी भवानीपूरमधून माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव केला आहे. प्रथेनुसार, ममता बॅनर्जी यांनाही शपथविधी सोहळ्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

**अधिकारी यांच्यासह पाच आमदारांनी घेतली मंत्रिपदाची शपथ**

**सुवेंदू अधिकारी यांच्यानंतर दिलीप घोष यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. यानंतर अग्निमित्रा पॉल यांनीही शपथ घेतली. फॅशन डिझायनर ते राजकारणी असा प्रवास केलेल्या अग्निमित्रा या आसनसोल दक्षिणमधून आमदार म्हणून निवडून आल्या आहेत. तसेच, अशोक कीर्तनिया, खुदीराम टुडू आणि मथाभंगा मतदारसंघाचे आमदार निसिथ प्रमाणिक यांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली.**

**नरेंद्र मोदींनी मंचावर पोहोचताच मिठी मारली, पायाही पडले; कोण आहेत माखनलाल सरकार?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यासपीठावर येत सर्व प्रथम भाजपचे पश्चिम बंगालमधील सर्वात वयोवृद्ध कार्यकर्ते माखनलाल सरकार यांचा सत्कार केला. वयाच्या ९२ व्या वर्षीही माखनलाल सरकार कार्यरत आहेत. खुद्द श्यामाप्रसाद मुखर्जींसह त्यांनी काम केलंय. माखनलाला सरकार यांना खाली वाकून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नमस्कार केला. तसेच शाल देऊन नरेंद्र मोदी यांनी माखनलाल सरकार यांना मिठीही मारली. काश्मीरमध्ये भारतीय तिरंगा फडकवण्याच्या आंदोलनादरम्यान भाजपचे संस्थापक श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्यासोबत असताना माखनलाल सरकार यांना अटक करण्यात आली होती.

# तीन आरोपींना जन्मठेप

## अतिरिक्त सत्र न्यायालय, उदगीर यांचा महत्त्वपूर्ण निकाल

**लातूर/प्रतिनिधी :** उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर खून प्रकरणात अतिरिक्त सत्र न्यायालय उदगीर यांनी महत्त्वपूर्ण निकाल देत तीन आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. न्यायाधीश डी. बी. म्हालटकर यांनी सत्र खटला क्र. २५/२०२१ मध्ये हा निकाल दिला.

सदर प्रकरणात उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुरनं. ६३/२०२१ अन्वये भादंवि कलम ३०२, ३०७, ३४१, १४३, १४७, १४८, १४९ तसेच आर्म अक्ट कलम ४ व २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील फिर्यादी जनाबाई बाळासाहेब बिरादार, रा. दैठणा ह.मु. हेर ता. उदगीर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तपासाची दिशा निश्चित करण्यात आली होती. पोलिसांनी वरिष्ठांचे मार्गदर्शनात व सूचनेनुसार अतिशय बारकाईने गुन्ह्याच्या तपास करून साक्षीदारांचे जबाब, आरोपीविरुद्ध भरपूर परिस्थितीजन्य व भौतिक पुरावे गोळा करून बालाजी माधव जगताप वय ६० वर्षे,
लहु बालाजी जगताप वय २५ वर्षे,
अंकुश बालाजी जगताप वय २२ वर्षे, सर्व रा. हेर ता. उदगीर. यांच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

खटल्याच्या सुनावणीअंती न्यायालयाने आरोपी क्र. १, २ व ३ यांना भादंवि कलम ३०२ अन्वये जन्मठेप व प्रत्येकी १००० रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना अतिरिक्त कारावास अशी शिक्षा सुनावली. तसेच कलम ३०७ सह ३४ अन्वये १० वर्षे सक्तमजुरी व प्रत्येकी १००० रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना अतिरिक्त शिक्षा सुनावण्यात आली. याशिवाय कलम ३२३ सह ३४ व कलम ३४१ सह ३४ अन्वये देखील शिक्षा सुनावण्यात आली.

या प्रकरणाचा तपास तत्कालीन तपास अधिकारी पोलीस निरीक्षक दिपकुमार वाघमारे यांनी वरिष्ठांचे मार्गदर्शनात अत्यंत बारकाईने व शास्त्रोक्त पद्धतीने केला. न्यायालयीन कामकाजात पैरवी अंमलदार पोलीस अमलदार ए. एस. शेख यांनी प्रभावी समन्वय साधला.

सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्री. एस. एम. गिरवलकर यांनी सक्षम युक्तिवाद करून आरोपींविरुद्धचे ठोस पुरावे प्रभावीपणे न्यायालयासमोर मांडले. त्यांच्या प्रभावी युक्तिवादामुळे आरोपींना कठोर शिक्षा होण्यास मदत झाली.

गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये काटेकोर तपास, सक्षम पुरावे व प्रभावी न्यायालयीन पाठपुरावा यामुळे दोषींना शिक्षा मिळवून देण्यात लातूर जिल्हा पोलीस दल सातत्याने यशस्वी ठरत असल्याचे या निकालातून अधोरेखित झाले आहे.

# दिव्यांग तपासणीत उपजिल्हा रुग्णालयात दिरंगाईमुळे संताप, आंदोलनाचा इशारा

**डॉक्टर वेळेवर तपासत नाहीत... प्रमाणपत्रासाठी हेलपाटे....**



*तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात येऊन ताटकळत बसावे लागते, डॉक्टर वेळेवर येत नाहीत. शारीरिक अडचणींमुळे बसणेही कठीण जाते, तरीही आमच्या समस्यांकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. तपासणी झाल्यानंतरही प्रमाणपत्र मिळण्यासाठी महिनोनमहिने चकरा माराव्या लागतात.*

*- शहाजी मोरे, सावरी, ता. निलंगा, दिव्यांग लाभार्थी*

**निलंगा/आयुब बागवान :** निलंगा उपजिल्हा रुग्णालयात दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी दिव्यांगांच्या तपासणीसाठी विशेष कॅम्प आयोजित केला जातो. मात्र या बुधवारी उपजिल्हा रुग्णालयात ठेवण्यात आलेल्या कॅम्पमध्ये मोठ्या संख्येने दिव्यांग लाभार्थी तपासणीसाठी आले होते. कॅम्पसाठी लातूरहून येणारे संबंधित अधिकारी आणि डॉक्टर वारंवार उशिरा येत असल्याने दिव्यांग बांधवांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत असल्याचा गंभीर आरोप भारतीय जनता पार्टी अपंग आघाडीचे तालुका अध्यक्ष महेश सरतापे यांनी केला आहे.

याबाबत बोलताना सरतापे म्हणाले की, अनेक दिव्यांग नागरिक सकाळी आठ वाजल्यापासून उपजिल्हा रुग्णालयात तपासणीसाठी येऊन बसतात, मात्र दुपारी एक वाजेपर्यंतही संबंधित अधिकारी उपस्थित राहत नाहीत. त्यामुळे दिव्यांग, त्यांचे पालक आणि नातेवाईक यांना ताटकळत बसावे लागते. आधीच शारीरिक अडचणींमुळे त्रस्त असलेल्या दिव्यांगांना अशा निष्काळजी कारभारामुळे मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, या उशिराबाबत जाब विचारला असता संबंधितांकडून अरेरावीची भाषा वापरली जाते, असा आरोपही त्यांनी केला. 'दिव्यांगांच्या सोयीसाठी रुग्णालय प्रशासनाने तपासणीची निश्चित वेळ दर्शविणारा सूचना फलक लावणे गरजेचे आहे. त्यामुळे दिव्यांग योग्य वेळी उपस्थित राहू शकतील,' अशी मागणीही त्यांनी केली.

# तब्बल १ कोटी १८ लाख २७ हजार रुपयांचा ७१४ किलो गांजा जाळून केला नष्ट

**लातूर/प्रतिनिधी :** पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या उपस्थितीत छउझड अंतर्गत जप्त अंमली पदार्थांचा कायदेशीर आणि शास्त्रोक्त पद्धतीने नाश करण्यात आला.जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांकडून आणि स्थानिक गुन्हे शाखेकडून विविध ४५ गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेला तब्बल १ कोटी १८ लाख २७ हजार रुपयांचा अंमली पदार्थ साठा आज कायदेशीर आणि शास्त्रोक्त पद्धतीने जाळून पूर्णपणे नाश केला. या कारवाईत सुमारे ७१३.९२ किलो गांजा, २१.२०० किलो अफू आणि ९६ ग्रॅम एमडी ड्रग्ज यांचा समावेश होता.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली.

लातूर जिल्हा पोलीस दलाने मागील काही महिन्यांत अंमली पदार्थांची लागवड, वाहतूक, विक्री आणि सेवन याविरोधात सातत्याने विशेष मोहिमा राबवत मोठ्या प्रमाणावर कारवाया केल्या होत्या. त्या कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेला गांजा, अफू व इतर अंमली पदार्थ न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून नाश करण्यासाठी आवश्यक आदेश प्राप्त करण्यात आले. त्यानुसार आज सकाळी छउझड अक्ट कलम ५२ (अ) अन्वये अधिकृत पंचनामा प्रक्रिया राबवून संपूर्ण मुद्देमाल



किर्ती ऑईल मिल, अतिरिक्त एमआयडीसी, लातूर येथे कायदेशीर प्रक्रिया करून पंच, समिती सदस्य आणि अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सर्व मुद्देमाल फायर बॉयलरमध्ये टाकून पूर्णतः जाळून नाश करण्यात आला. कारवाईदरम्यान कोणतेही प्रदूषण होऊ नये तसेच परिसरातील नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही यासाठी विशेष दक्षता घेण्यात आली होती. यावेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, अग्निशमन दल, आरोग्य विभाग, रासायनिक विश्लेषकांचे पथक, वैध मापन विभागाचे अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती ठेवण्यात आली होती.

या कारवाईवेळी प्रभारी पोलीस उपाधीक्षक (गृह) दत्तात्रय निकम, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे, स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे व पोलीस मुख्यालयाचे पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

## प्रभात किरणे

कष्टविनाशेत, नाही रे पिकतं
अभ्यासाविना यश, नसे मिळतं
स्वार्थ सोडता, मिळते रे सुख
मोहमुक्त होता, न छले दुःख

इंजि. नागनाथ कलवले, लातूर
मो. ९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



जलयुक्त शिवार करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश...

## चिमटा दयाचा



वाहातुकीला शिस्त
लावण्यासाठी उभे
केले खांब!
तरीही गर्दी नियंत्रणात
आणणे होतात हाल!!
चौकातील अतिक्रमणमुळे चालताना
भोगावा लागतो त्रास!!!

# आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्सने महाराष्ट्रातील लातूरमध्ये नवीन शाखा उघडून महाराष्ट्रातील बाजारपेठेवर आपली पकड अधिक मजबूत केली

**नव्या शाखेच्या शुभारंभाच्या निमित्ताने ऑफर: शून्य लॉगिन फी आणि ५० लाख रुपयांपर्यंतच्या कर्जांना तात्काळ मंजुरी**

ADITYA BIRLA CAPITAL
HOME LOANS

**लातूर/प्रतिनिधी :** आदित्य बिर्ला कॅपिटल लिमिटेडची उपकंपनी आणि गृहनिर्माण क्षेत्रातील आघाडीची वित्त पुरवठादार कंपनी असलेल्या आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेडने (एबीएचएफएल) आपल्या देशव्यापी वितरण जाळ्याचा विस्तार करण्याच्या योजनेचा भाग म्हणून महाराष्ट्रातील लातूरमध्ये नवी शाखा सुरु करून महाराष्ट्रात अजून एक पुढचे पाऊल उचलले आहे. या नवीन शाखेसह, महाराष्ट्रातील आदित्य बिर्ला कॅपिटल लिमिटेडच्या शाखांची एकूण संख्या आता ३२ झाली आहे. यामुळे वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमधील कंपनीची पकड अधिक घट्ट झाली असून ग्राहकांना देखील सेवा मिळवणे अधिक सोपे झाले आहे. लातूरमध्ये सध्या परवडणाऱ्या घरांची आणि गृहकर्जासाठी मोठी मागणी आहे, विशेषतः स्वतःचा व्यवसाय करणाऱ्यांसाठी आणि छोट्या व्यापाऱ्यांसाठी या शहरात नवनवीन संधी निर्माण होत आहेत. ही नवीन शाखा स्थानिक ग्राहकांच्या गरजा ओळखून त्यांना अतिशय सहज आणि सुलभ पद्धतीने गृहकर्ज मिळवून देण्यासाठी सज्ज आहे. आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड विविध ग्राहक वर्गांसाठी तयार केलेल्या गृहनिर्माण वित्त उपायांची सर्वसमावेशक श्रेणी प्रस्तुत करते. यामध्ये परवडणारी घरे, प्राईम हाऊसिंग, बांधकामासाठी वित्तपुरवठा आणि मालमत्तेवर कर्ज यांचा समावेश आहे. हे उपाय पगारदार व्यक्ती, स्वयंरोजगार व्यावसायिक, बिगर-व्यावसायिक स्वयंरोजगार आणि उदयोन्मुख उत्पन्न गटांच्या गरजा पूर्ण होतात. आपल्या मजबूत डिजिटल यंत्रणेच्या जोरावर, आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या ग्राहकांना सुलभ नोंदणी, जलद मंजुरी आणि वाढीव पारदर्शकता प्रदान करते, ज्यामुळे ग्राहकांना एक उत्तम अनुभव मिळण्याची खात्री मिळते.

या शुभारंभाचे औचित्य साधून, आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ग्राहकांना शून्य लॉगिन फी आणि ५० लाखांपर्यंत कर्जांना तात्काळ मंजुरी ही खास ऑफर देत आहे. ही ऑफर ६ मे ते ३१ मे २०२६ पर्यंत वैध असून, यामुळे या नवीन शाखांमधील ग्राहकांना जलद आणि अधिक परवडणाऱ्या दरात कर्ज मिळवणे सोपे होणार आहे. विस्ताराबाबत बोलताना आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे एमडी आणि सीईओ श्री. पंकज गाडगीळ म्हणाले, महाराष्ट्र ही आमच्यासाठी विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाची बाजारपेठ आहे. वाढती मागणी आणि लोकांच्या वाढत्या आकांक्षा लक्षात घेता, ग्राहकांशी असलेला आमचा संपर्क अधिक दृढ करण्यासाठी आम्ही आमचा प्रादेशिक विस्तार वाढवत आहोत. आमचे विस्तारत चाललेले वितरण जाळे आणि आमची मजबूत डिजिटल क्षमता यांची सांगड घालून, ग्राहकांसाठी घर घेण्याचा प्रवास अधिक सोपा, जलद आणि त्रासमुक्त करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

'हॅप्पी होम लोन जर्नी' (आनंदी गृहकर्ज प्रवास) प्रदान करण्याची आपली बांधिलकी कायम राखत, आदित्य बिर्ला होम फायनान्स लिमिटेड आपल्या या विस्तारातून ग्राहकांचे हित, सुरक्षित कर्ज प्रक्रिया आणि विविध कर्ज योजनांच्या माध्यमातून सर्वांना आर्थिक प्रवाहात सामील करून घेण्यावर आपला विश्वास व्यक्त करत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरिण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## राजकारणातून समाजकारण लोप पावत आहे

राजकारणातून समाजकारण साधता येते म्हणून अनेकांची उडी राजकारणात घेतली जाते. पुर्वीचे राजकारणा व सध्याचे राजकारणातील फरक अधिक दिसून येतो. निवडणुका ह्या लोकशिक्षणाचे काम करताता असे वाटत असले तरी लोकशिक्षणाएवजी हिंसात्मक घटना दिसून येतात. नुकत्याच पाच राज्यातील विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या, येथे वादग्रस्त समजल्या जाणाऱ्या प.बंगालमधील निवडणुकीत ममता बॅनर्जी यांच्या पक्षाला पराभव पत्कारावा लागला. ममता बॅनर्जी तीन वेळा मुख्यमंत्रीपद भुषविल्या आहेत. यावेळी जनतेला भाजपा एक पर्याय मिळाला. भाजपाकडून आश्वासने मिळाली. त्यामुळे ममता यावेळी नको म्हणून दुसरा पर्याय मतदारांनी निवडला. प. बंगालमध्ये भाजपाला यश मिळविणे आवघड होते तरी त्यानी प्रयत्न सोडला नाही. संघाच्या मंडळींनी एक महिणा कसून प्रयत्न केले व मतदार नागरिकांना मतदानासाठी घराबाहेर काढले. सर्वाधिक मतदानाचा आकडा होता. या मागील कारण म्हणजे मतदारांना मतदानासाठी बाहेर काढणे एक आव्हाण होते. ते संघाने पुर्ण केल्याचे समजते. लोकशाहीचा आदर करणाऱ्या व घटनेला मानणाऱ्या ममता बॅनर्जी ह्या पायउतार होण्यास तयार नसल्याचे सांगण्यात येते. मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देणार नाही असे म्हणत घटनेचा आदर करणे अपेक्षित नव्हते. राजकारणी, स्वार्थापोटी घटनेचा उपयोग करून घेताता. लोकशाहीचा आनादर करताना दिसून येतात. घटना व लोकशाहीचा वापर जनतेसाठी होणे अपेक्षित असताना तो स्वस्वार्थापोटी केला जात नाही. निकाल लागला. ममताला अपयश आले हे उघड आहे. ममता यांच्या पक्षाच्या कार्यालयात शस्त्रे सापडली हे अशोभनिय आहे. मुख्यमंत्री म्हणून राज्याचे प्रमुख समजले जातात.जनतेविषयक काळजी घेणे अपेक्षित असताना जे देशविरोधी समजले जातात. घुसखोर समजले जातात त्यांचा लाड अधिक काळ जनतेला सहन झालेला नाही. तसे पाहिले तर ममता बॅनर्जी यांचे वजन होते. ज्यावेळी तिसरी आघाडी निर्माण करताना प्रमुखपदी ममताचे नाव आघाडीवर असते. भाजपासुद्धा अधिक प. बंगालकडे अधिक लक्ष देत नव्हते. प. बंगालमध्ये अतिरेक होवू लागला व हिंदुंची हत्त्या होवू लागली, त्यावेळी भाजपाने लक्ष दिले. अतिसंवेदनशील प्रांत असताना भाजपा व हिंदुकार्यकर्त्यांनी धाडसाने काम केले. कोणत्याही दबावाला घाबरले नाहीत. अनेकांनी बांगलादेशातून अनाधिकृतपने घुसखोरी केली आहे. बांगला देशातून ते भारतीय रहीवासी बनले गेले. वास्तविक याला विरोध नाही तर घुसखोरी करून हिंदुंची हत्त्या केली जाते या प्रवृत्तीस विरोध आहे. ममता बॅनर्जी ह्या चौथ्यावेळी राज्याचे सुत्रे हाती घेण्यासाठी सज्ज होत्या मात्र अधिक घुसखोरी वाढली गेली, हिंसा घडू लागल्या, हिंदुना जगणे कठिण होवू लागले. मुक्या प्राण्याची जशी मोठ्या प्रमाणात गाईची हत्त्या केली जावू लागली त्यावेळी ममता यांच्या बाबत घृणा निर्माण होवू लागली. वास्तविक ममता बॅनर्जी ह्या भारतीय आहेत. त्या बांगला देशी किंवा पाकिस्तानी नाहीत. सुरवातीच्या काळात त्यांचे कार्य चांगले होते. माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी बाजपाई यांनी त्यांना नावाजलेले होते. अशा स्थितीत त्यांनी परदेशिय किंवा घुसखोरांच्या नादात लागणे योग्य नव्हते. उलट त्यांनी त्यांचे नुकसान करून घेतले आहे. आता भाजपाच्या हाती पुर्ण बहुमतांनी सत्ता मिळविली आहे. त्यामुळे बुलडोझर बाबाच्या पावलावर पावुल टाकून कार्य करण्यात येवू शकेल. त्याच प्रमाणे बिहारमध्ये भाजपाचे मुख्यमंत्रीपदी असल्याने ते घुसखोरांचा लाड चालू देणार नाहीत. आता प. बंगालमध्ये देशविरोधी काम करणाऱ्याची खैर नाही. हिंदुंची लोकसंख्या कमी होत आहे तर घुसखोर, देशविरोधकांची संख्या वाढत आहे. असे तरी असले तरी आता प. बंगालमध्ये भाजपाचे पुर्णलक्ष असून विकासाबरोबर आपल्या बाजूने कसे जनतेला आकर्षित केले जाईल याचा विचार आगामी काळात होणार आहे. प.बंगालचा चेहरामोहरा बदलण्याचे काम हाती घेवून जनतेच्या मनातून कायमचे ममताचे कार्य विसरायाला लावणारे काम होणार आहे यात शंका घेण्याचे कारण नाही. निवडणुका झाल्या निकाल लागल्यानंतरसुद्धा हिंसाचार होते याचा अर्थ या राज्यातील कायदा व सुव्यवस्था पुर्ण ढासळली आहे हे उघड दिसून येते. प.बांगलामध्ये यावेळी बदल झाला नसता तर हा प्रदेश शेजारी देशाला जोडला जाण्याची शक्यता होती. अनेकांनी घुसखोरी केली आहे. बनावट आधारकार्डाच्या आधारे रहिवासी बनले आहेत अशांचा शोध घेतला पाहिजे. जे घुसखोर आहेत ते भारताविरोधी कार्य करताता, हिंसा घडवितात याला विरोध आहे. देशातील जनतेला प.बंगालमधील ज्या घटना घडत होत्या, त्या बाबत नाराजी होती. ममता बॅनर्जी ठराविक समाजाला मतासाठी जवळ करणे, त्यांच्या कार्यक्रमात हजर राहाणे, उपवास सोडताना सहभागी होणे हे योग्य नव्हते. मुख्यमंत्री हा राज्यातील सर्व जनतेचे असताना इतर समाजाच्या सोहळ्यात जाणे अपेक्षित असते. दिवाळीत त्या किती प्रमाणात हिंदुच्या सणात सहभागी होत होत्या हे जनतेला दिसून येत नाही का? ममता बॅनर्जी यांच्या अशाच काही चुकामुळे त्यांना पायउतार व्हावे लागले आहे. ज्या समाजाचा लाड केला त्या समाजचा विकास किती प्रमाणात झाला. त्या समाजाकडून हिंसा घडविणे हा विकास नाही. हे लक्षात आले पाहिजे. जनतेच्या मताचा कौल मान्य करून स्वाभिमानाने पायउतार होणे अपेक्षित होते. मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार नाही असे मत व्यक्त करणे शोभत नाही. जनमताचा कौल मिळाल्यानंतर पदास चिटकून राहाणे तीन वेळा मुख्यमंत्रीपदी असणाऱ्यांना शोभत नाही. लोकशाही, घटना याचा आदर केला पाहिजे. केवळ संविधानाचा आदर करा हे इतरांना सांगता मात्र आपणमात्र अमलबजावणी करण्यापासून दूर राहाता हे योग्य नाही. प. बंगालमध्ये सुशासना निर्माण करण्यासाठी एक प्लॅन तयार करावा लागेल, अनाधिकृतांची व घुसखोरांची यादी तयार करून त्यांना समज द्यावी लागेल. एकदम कायदा व सुव्यवस्था राबविणे आवघड होणार आहे. विकासासोबत सुस्थितीत राज्य चालविणे मोठे आव्हान आहे हे मात्र नक्की! हे आव्हान पेलवावे लागेल.

# आधुनिक तंत्रज्ञानामुळे शासकीय सेवा अधिक गतिमान

### टेक वारी २.० मधील तांत्रिक प्रशिक्षण क्षेत्रात तज्ज्ञांचे मत





**मुंबई/प्रतिनिधी :** कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल प्रणाली आणि आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरामुळे शासकीय सेवा अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख होत असल्याचे मत सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयोजीत टेक वारी २.० मधील तांत्रिक प्रशिक्षण सत्रात तज्ज्ञांनी व्यक्त केले.

मंत्रालयातील परिषद सभागृहात आयोजित या प्रशिक्षण सत्रात डेटा व्यवस्थापन, माहिती केंद्रे, जीपीयू आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणालींच्या वापराबाबत प्रायमस पार्टनर्सचे अभिजित धर, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एनआयसी), महाराष्ट्राच्या राज्य सूचना अधिकारी सपना कपूर तसेच गुगलचे वरिष्ठ तांत्रिक विशेषज्ञ प्रवीण दवे यांनी मार्गदर्शन केले.

सत्राच्या प्रारंभी अभिजित धर यांनी माहिती केंद्रांची मूलभूत रचना, प्रक्रिया प्रणाली, माहिती साठवण व्यवस्था, नेटवर्क प्रणाली आणि आभासी प्रणाली याबाबत मार्गदर्शन केले. शासनाच्या विविध डिजिटल सेवा माहिती केंद्रांमधून कशा कार्यरत असतात, तसेच क्लाउड तंत्रज्ञान, माहिती सुरक्षा आणि पर्यायी माहिती केंद्र व्यवस्थेचे महत्व त्यांनी स्पष्ट केले.

सपना कपूर यांनी शासनाच्या डिजिटल प्रणालींबाबत माहिती देताना विविध विभागांमधील माहिती एकत्रितपणे जोडण्याचे महत्त्व अधोरेखित केले. नागरिकांना अधिक जलद आणि सुरक्षित सेवा देण्यासाठी डिजिटल पायाभूत सुविधा मजबूत करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रवीण दवे यांनी जीपीयू, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक माहिती केंद्रांची कार्यपद्धती याविषयी मार्गदर्शन करताना मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या सीसीटीव्ही चित्रफितींचे तत्काळ विश्लेषण, वाहतूक नियमभंग ओळखणे तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सतर्कता प्रणालींचा वापर याबाबत सोदाहरण माहिती दिली. केंद्रीय प्रक्रिया युनिट आणि जीपीयू यांतील फरक तसेच समांतर प्रक्रिया प्रणालीचे महत्व त्यांनी स्पष्ट केले. 'सर्वम एआय'च्या प्रात्यक्षिकातून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने शासकीय सेवा अधिक प्रभावी आणि कार्यक्षम पद्धती-ने कशा देता येऊ शकतात, याची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

# शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या कडून दहावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन

- राज्यात ९२.०९ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण
- मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ५.४० ने अधिक
- कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक ९७.६२ टक्के



**मुंबई/प्रतिनिधी :** दहावीच्या निकालाचा क्षण हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परी-क्षेचा निकाल मंडळामार्फत जाहीर करण्यात आला असून यशस्वी विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी अभिनंदन केले. या परीक्षेत ज्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, त्यांनी खचून न जाता पुन्हा प्रयत्न करावेत, शासन आपल्या पाठिशी आहे, असा विश्वास त्यांनी या विद्यार्थांना दिला.

मंत्री दादाजी भुसे यांनी ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या अथक परिश्रमाने आणि जिद्दीने या परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांबरोबरच त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणारे शिक्षक आणि माता-पिता यांचेही विशेष अभिनंदन केले. विद्यार्थी हे महाराष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांच्या कर्तृत्वाने त्यांच्याबरोबरच राज्य आणि देश निश्चितच प्रगती करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

या परीक्षेत अपेक्षित यश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना दिलासा देताना एका परीक्षेचा निकाल तुमचे संपूर्ण आयुष्य किंवा तुमची बुद्धिमत्ता ठरवू शकत नाही. ही पहिली पायरी आहे. त्यामुळे खचून न जाता पुन्हा प्रयत्न करा. शासन तुमच्या पाठीशी आहे. फेरपरीक्षेची संधी उपलब्ध असल्याने तिचा लाभ घ्या, असेही त्यांनी म्हटले आहे.

**निकालाची वैशिष्ट्ये**

या परीक्षेत राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५,५५,०२६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,४२,४७२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून १४,२०,४८६ विद्यार्थी उत्त-ीर्ण झाले आहेत. उतीर्णतेची टक्केवारी ९२.०९ इतकी आहे.

मुलींचे उत्तीर्ण होण्याची टक्केवारी अधिक

दहावीची परीक्षा दिलेल्या एकूण ८,२०,४२७ मुलांपैकी ७,३४,८१४ मुले (८९.५६ टक्के) तर एकूण ७,२२,०४५ मुलींपैकी ६,८५,६७२ मुली (९४.९६ टक्के) उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलींची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ५.४० ने अधिक आहे.

**कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक**

सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थ्यांचा कोकण विभागाचा निकाल (९७.६२ टक्के) सर्वाधिक असून सर्वात कमी निकाल छत्रपती संभाजीनगर विभागाचा (८८.४१ टक्के) आहे. इतर विभागांमध्ये कोल्हापूर विभागाचा निकाल ९५.४७ टक्के, मुंबई- ९४.९७, पुणे- ९४.२४, नाशिक- ९०.५३, अमरावती- ९०.५०, नागपूर- ८९.०७ तर लातूर विभागाचा निकाल ८८.४२ टक्के लागला आहे.

**श्रेणीनिहाय निकाल**

एकूण उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये प्राविण्यासह प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण २७.४१ टक्के, प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण ३१.२६ टक्के, द्वितीय श्रेणीमध्ये २४.६६ टक्के तर उत्तीर्ण श्रेणीमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण ८.७५ टक्के इतके आहे.

**श्रेणीसुधार/ गुणसुधार योजना**

परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी/ गुणस-ुधार योजनेअंतर्गत लगतच्या तीन परीक्षांमध्ये पुनःश्च प्रविष्ट होता येईल. फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या परीक्षेस प्रविष्ट होऊन सर्व विषयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना (एकाच वेळी सर्व विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या) जून-जुलै २०२६, फेब्रुवारी-मार्च २०२७, जून-जुलै २०२७ च्या दहावीच्या परीक्षेस 'श्रेणीसुधार/ गुणसुधार' साठी प्रविष्ट होण्यास तीन संधी देण्यात येत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत देण्यात आली आहे.

# कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी पॉश कायद्याची कडक अंमलबजावणी करणे अनिवार्य

**मुंबई/प्रतिनिधी :** कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळास आळा घालण्यासाठी पॉश कायद्याची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत. दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे आणि तिची नोंद केंद्र शासनाच्या शी-बॉक्स पोर्टलवर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे पालन न केल्यास संबंधित आस्थापना प्रमुखावर ५० हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद असून, पुनरावृत्ती झाल्यास दुप्पट दंड अथवा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास विभागाचे आयुक्त जगदिश मिनियार यांनी दिली आहे.

नाशिक येथील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत घडलेल्या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर हे निर्देश जारी करण्यात आले असून महिलांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील काही खाजगी आस्थापनांमध्ये समित्या स्थापन झाल्या असून, आस्थापनांनी तातडीने समित्या स्थापन कराव्यात अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच शी-बॉक्स पोर्टलवर नोंदणी तातडीने करण्यात यावी, असे पत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.




पॉश क्ट कायद्याअंतर्गत प्रत्येक समितीमध्ये वरिष्ठ महिला अध्यक्ष, किमान दोन कर्मचारी सदस्य आणि स्वयंसेवी संस्थेतील एक सदस्य असणे आवश्यक असून समितीतील किमान ५० टक्के सदस्य महिला असणे बंधनकारक आहे.

जिल्ह्यातील सर्व पात्र आस्थापनांमध्ये अंतर्गत समित्या स्थापन झाल्या आहेत का, त्यांची रचना कायद्यानुसार आहे का, तसेच शी-बॉक्स पोर्टलवर नोंदणी झाली आहे का, याची खात्री करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि विविध विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांच्या देण्यात आले आहेत. तसेच भारतीय न्याय संहिता अंतर्गत लैंगिक छळ, पाठलाग, गुप्त चित्रण आणि स्त्रीच्या सन्मानाला धक्का पोहोचविणाऱ्या कृत्यांवर फौजदारी कारवाई होऊ शकते, याचीही स्पष्ट सूचना देण्यात आली आहे. महिला व बाल विकास आयुक्त जगदीश मिनियार यांनी सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांनी पॉश क्ट ची तात्काळ व प्रभावी अंमलबजावणी करून महिलांसाठी सुरक्षित कार्यस्थळ निर्माण करण्याचे आवाहन केले आहे.

## नुसतंच खाऊ नका, कशासोबत काय खाताय ते तपासा!




गरम गरम भातावर दही घालून खाल्ल्याने अनेक जणांना रुग्णालयात दाखल करावे लागल्याच्या घटना वारंवार घडतात. अंडी आणि फळे खाल्ल्यानेही अशीच परिस्थिती उदभवू शकते. आहारशास्त्रानुसार काही अन्नपदार्थ एकत्रित खाणे टाळावे, असे सांगितले आहे. तसे केल्यास पचनावर परिणाम होऊ शकतो, तसेच काही वेळा अस्वस्थता, सिडिटी किंवा लर्जीचा त्रासही जाणवू शकतो. त्यामुळेच शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थ खाताना ते पुरक असावेत याची काळजी घ्यायची सुचना आहारतज्ञ करतात.

अति जड दोन प्रकारचे पदार्थ एकत्र खाणं टाळा. उदाहरणार्थ एकाच वेळी मासळी आणि मटण, किंवा अंडी आणि पनीर एकत्र खाऊ नका. यामुळे यकृतावर ताण येतो आणि अन्नाचे नीट शोषण होत नाही.

**फळे खाण्याची योग्य पद्धत**

फळे नेहमी स्वतंत्रपणे खावीत, जेवणासोबत नको. जेवण झाल्यावर लगेच फ्रूट डिश खाणे टाळा. कारण, फळे लवकर पचतात, पण जेवणासोबत ती पोटात थांबल्यास तिथे त्यांची आंबायला सुरुवात होते. ज्यामुळे अपचन आणि पोट फुगते. शरीरावर त्याचे विपरित परिणाम होतात.

**दूध व आंबट फळे** (उदा. संत्री, लिंबू) : सिडिटी, पोटदुखी होऊ शकते.

**दूध व मीठयुक्त पदार्थ :** पचनक्रियेला त्रासदायक.

फळे व जड जेवण (उदा. फळे + भात/ पोळी) : फळे लवकर पचतात, तर जड अन्न उशिरा; त्यामुळे गॅस किंवा फुगवटा.

**दही व गरम पदार्थ :** काहींना अपचन किंवा आम्लपित्ताचा त्रास जाणवतो.

**विरुद्ध आहार म्हणजे काय?**

विरुद्ध आहार म्हणजे असे अन्नपदार्थ, की जे शरीराच्या प्रकृती, पचनशक्ती, ऋतू, वेळ किंवा पदार्थांच्या गुणधर्मांच्या विरुद्ध असतात आणि त्यामुळे आजार होऊ शकतात.

**तापमान विसंगती**

अति गरम आणि अति थंड पदार्थ एकापाठोपाठ घेऊ नका. उदाहरणार्थ गरम गुलाबजाम आणि व्हॅनिला आईस्क्रिम किंवा गरम चहा आणि थंड पाणी. यामुळे दातांचे इनॅमल खराब होणे, घसा बसणे आणि पचनसंस्थेवर थर्मल शॉक बसण्याची शक्यता असते.

**दुधाबाबत काळजी घ्या**

दूध हे पूर्णान्न आहे, पण ते इतर काही पदार्थांसोबत विष बनू शकते.

**नका घेऊ :** दूध आणि मीठ (उदा. चहा-चपाती किंवा दुधासोबत नमकीन पदार्थ).

**नका घेऊ :** दूध आणि आंबट फळे (उदा. स्ट्रॉबेरी/मँगो शेक, जर फळे पूर्ण पिकलेली नसतील तर).

**नका घेऊ :** मासे व दूध, मांस व दही/दूध, अंडी व फळे (विशेषतः गोड फळे).

## तोंडातील फोडांकडे नका करु दुर्लक्ष



तोंडातील एखादी लहानशी जखम किंवा फोड (अल्सर) हे सहसा किरकोळ दुखापत, आहारातील बदल किंवा तात्पुरत्या उष्णतेमुळे असू शकतात. अनेकदा अशा जखमा काही दिवसांत आपोआप भरून येतात. मात्र, हा फोड किंवा चट्टा दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ तसाच राहिला, तर त्याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. वैद्यकीय निरीक्षणांनुसार, ओरल कॅन्सरची अनेक प्रकरणे ही सुरुवातीला साध्या वाटणार्या; पण बराच काळ न भरणार्या जखमांमुळेच बळावलेली दिसतात. अनेक रुग्ण तोंडातील जखमेकडे सुरुवातीला दुर्लक्ष करतात. जेव्हा ते डॉक्टरांचा सल्ला घेतात, तेव्हा आजार पहिल्या टप्प्याच्या पलीकडे गेलेला असतो. वास्तविक, वेळेवर निदान होणे आणि उपचाराचा परिणाम यांचा थेट संबंध असतो. सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास तोंडाचा कर्करोग मर्यादित शस्त्रक्रिया किंवा उपचारांनी बरा होऊ शकतो. याउलट, आजार बळावल्यावर तो ऊती (टिश्यूज), मानेतील लसिका ग्रंथी (लिम्फ नोडस्) आणि हाडांपर्यंत पसरतो. यामुळे उपचार अधिक गुंतागुंतीचे आणि प्रदीर्घ होतात. ओरल कॅन्सरसाठी काही प्रस्थापित घटक कारणीभूत ठरतात. यामध्ये तंबाखूचे सेवन, मद्यपान आणि ह्युमन पॅपिलोमा व्हायरसचा (एचपीव्ही) संसर्ग यांचा समावेश होतो. याव्यतिरिक्त तोंडाची अस्वच्छता, पोषक तत्त्वांची कमतरता आणि तोंडात वारंवार होणारी जळजळ किंवा घर्षण यांमुळेही कर्करोगाचा धोका वाढतो. मुख कर्करोगाचे एक मोठे आव्हान म्हणजे सुरुवातीच्या जखमा अनेकदा वेदनारहित असतात. दुखत नसल्यामुळे रुग्ण त्याकडे दुर्लक्ष करतो. वास्तविक, लक्षणे दोन आठवड्यांहून अधिक काळ राहिल्यास त्वरित डॉक्टरांकडे जाणे गरजेचे असते.

**लक्षणे कोणती?**

१. न भरणारी तोंडातील जखम किंवा फोड.
२. जिभेवर किंवा तोंडाच्या आतील बाजूस असलेले पांढरे किंवा लाल चट्टे.
३. तोंडात निर्माण झालेली गाठ किंवा कडकपणा जाणवणे.
४. कारणाशिवाय होणारा रक्तस्राव.
५. गिळताना त्रास होणे किंवा आवाजात बदल होणे.

या जखमेवर वेळीच उपचार केले नाहीत, तर ती आजूबाजूच्या स्नायू आणि हाडांवर आक्रमण करते. पुढील टप्प्यात हा कर्करोग मानेतील ग्रंथींमध्ये पसरतो आणि नंतर शरीराच्या इतर भागांतही जाऊ शकतो. यामुळे केवळ जगण्याची शक्यता कमी होत नाही, तर दैनंदिन शारीरिक कार्यांवरही (गिळणे, बोलणे, चघळणे) मर्यादा येतात.

सबब, तोंडातील कोणतीही जखम १४ दिवसांपेक्षा जास्त काळ टिकली, तर तज्ज्ञ डॉक्टरांकडून किंवा दंतवैद्याकडून तिची तपासणी करून घ्यावी. तंबाखू आणि मद्यपानापासून दूर राहणे हा कर्करोगाचा धोका कमी करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. जे लोक तंबाखू किंवा इतर जोखीम असलेल्या घटकांच्या संपर्कात आहेत, त्यांनी वेळोवेळी तोंडाची तपासणी करून घेणे हिताचे असते.

**- डॉ. गौरांगी वैद्य**

# घरच्या घरी बॉडी
## बनवण्यासाठी महत्त्वाच्या टिप्स

नियमित व्यायाम :आठवड्यातून किमान ५ दिवस व्यायाम करा.स्कॉट , पुशअप्स, पुलअप्स आणि बेंच प्रेस यांसारखे संयुक्त व्यायाम करा, ज्यामुळे एकाच वेळी अनेक स्नायू मजबूत होतात. जिममध्ये न जाता घरीच बॉडी बनवण्यासाठी डिप्स, लंजेस आणि हँडस्टँड पुशअप्स उत्तम आहेत.संतुलित आणि पौष्टिक आहार:दिवसभरात ५ ते ६ वेळा थोडे-थोडे जेवण घ्या (दोनदा भरपूर खाण्याऐवजी). आहारात प्रथिनांचे प्रमाण वाढवा. सोयाबीन, अंडी, चिकन, पनीर, चणे, कडधान्ये, डाळी आणि ड्रायफ्रूट्स यांचा समावेश करा. काबरेहायड्रेट्ससाठी ओट्स, ब्राऊन राईस आणि बटाटे खा.पुरेशी झोप:व्यायामानंतर स्नायूंच्या वाढीसाठी दररोज ७-८ तासांची झोप घेणे अत्यंत आवश्यक आहे.पाणी आणि इतर बाबी:शरीरातील पाणी पातळी योग्य राखण्यासाठी भरपूर पाणी प्या (दिवसातून ३-४ लिटर).धूम्रपान आणि मद्यपान टाळा, कारण यामुळे स्नायूंच्या वाढीवर नकारात्मक परिणाम होतो.सातत्य आणि संयम:चांगली बॉडी बनवण्यासाठी काही दिवस नाही, तर महिन्यांची मेहनत लागते. संयम ठेवा आणि व्यायामात सातत्य ठेवा.टीप: कोणतीही नवीन व्यायाम पद्धत किंवा डाएट सुरू करण्यापूर्वी, फिटनेस ट्रेनर किंवा तज्ज्ञांचा सल्ला घेणे केव्हाही चांगले.



# एकरूपतेतील
## हरिनामाची अनुभूती

### अभंगवाणी : विद्यावाचस्पती विद्यानंद

**आम्हां आम्ही**
**आतां वडील धाकुटीं,**
**नाहीं पाठीं पोटीं कोणीं दुजें**
**फावला एकांत एकविध भाव,**
**हरि आम्हांसवे सर्व भोगी**
**तुका म्हणे अंगसंग एके ठायीं,**
**असों जेथें नाहीं दुजें कोणी**

मराठी संतसाहित्य हे भारतीय अध्यात्मपरंपरेतील एक अद्वितीय आणि लोकाभिमुख असे वैभव मानले जाते. या संतपरंपरेने केवळ भक्तीचा मार्ग दाखवला नाही; तर सामान्य माणसाच्या जीवनाला नैतिकता,समता आणि आत्मशांतीची दिशा दिली. या परंपरेतील संत तुकाराम महाराज हे एक असे तेजस्वी व्यक्तिमत्त्व आहे, की ज्यांनी आपल्या अभंग वाणीतून जीवनातील अत्यंत गूढ आणि तत्त्वज्ञानात्मक सत्ये सहज,सोप्या त्याचप्रमाणे लोकभाषेत व्यक्त केली. त्यांच्या शब्दांत कृत्रिमता नाही, दिखाऊपणा नाही; तर जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव, अंतर्मनातील तळमळ आणि परमेश्वराशी असलेल्या आत्मिक नात्याची अनुभूती आहे. म्हणूनच त्यांच्या अभंगांमधील प्रत्येक ओळ ही केवळ काव्यरचना न राहता ती मानवजीवनाला दिशा देणारे चिंतन बनते.

संत तुकाराम महाराजांच्या या अभंगांतून एक महत्त्वाचा सामाजिक संदेशही स्पष्टपणे दिसून येतो. समाजात माणसामाणसांत अनेक प्रकारचे भेद निर्माण झालेले दिसतात. जात, धर्म, संपत्ती, शिक्षण, प्रतिष्ठा आणि सत्तेच्या आधारावर माणूस स्वतःला इतरांपेक्षा वेगळे आणि श्रेष्ठ समजू लागतो. या अहंकारातून संघर्ष,अन्याय आणि असमानता निर्माण होते. पण तुकाराम महाराज सांगतात की प्रत्येक जीवामध्ये तोच परमेश्वर आहे. जेव्हा माणूस दुसर्यातील परमेश्वर पाहू लागतो; तेव्हा त्याच्या मनातील द्वेष आणि भेदभाव नाहीसे होतात. त्यामुळे त्यांच्या अभंगांमधील भक्ती ही केवळ वैयक्तिक मोक्षापुरती मर्यादित नसून ती समाजाला समतेचा आणि बंधुभावाचा संदेश देणारी आहे.

या अभंगांमध्ये संत तुकाराम महाराजांनी भक्ती, तत्त्वज्ञान आणि सामाजिक समतेचा अत्यंत सुंदर संगम घडवून आणला आहे. त्यांनी अत्यंत साध्या शब्दांत सांगितले की जेव्हा माणूस अहंकार, भेदभाव आणि स्वार्थ यांपासून मुक्त होतो; तेव्हा त्याला आत्मिक शांतीचा अनुभव येतो. या अभंगांचा विचार करताना आपण केवळ त्यांच्या शब्दांचा अर्थ समजून घेणे पुरेसे नाही; तर त्यांच्या मागील जीवनदृष्टी, आध्यात्मिक अनुभूती आणि सामाजिक संदेश समजून घेणे आवश्यक आहे. कारण या अभंगांमधून व्यक्त झालेली विचारसंपदा आजच्या काळातही तितकीच जिवंत, उपयुक्त आणि मार्गदर्शक आहे.

संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीत भक्त आणि भगवंत यांच्यातील नाते अत्यंत सहज, आत्मीय आणि अनुभवपूर्ण स्वरूपात व्यक्त झालेले दिसते. त्यांच्या अभंगांमध्ये भक्ती ही केवळ पूजा, कर्मकांड किंवा धार्मिक विधी यापुरती मर्यादित नसून ती आत्म्याच्या परमात्म्याशी होणार्या एकरूपतेची अनुभूती आहे. या अभंगांच्या ओळींतून संत तुकाराम महाराजांनी भक्तीच्या अत्युच्च अवस्थेचे वर्णन केले आहे. ही अवस्था अशी आहे की जिथे भक्त आणि भगवंत यांच्यातील भेद संपून जातो आणि जीवनात केवळ एकत्वाची अनुभूती उरते.

प्रतीकात्मक दर्शन

आम्हां आम्ही आतां वडील धाकुटीं,नाहीं पाठीं पोटीं कोणीं दुजें या ओळीत संत तुकाराम महाराज अत्यंत गूढ आणि गहन तत्त्वज्ञान सांगतात. वडील धाकुटीं या शब्दांतून नातेसंबंध, भेद, अहंकार आणि सामाजिक स्थान यांचे प्रतीकात्मक दर्शन घडते. समाजात प्रत्येक माणूस स्वतःची ओळख नातेसंबंध, पद, प्रतिष्ठा आणि अहंकार यांच्या आधारावर निर्माण करत असतो. कोणी मोठे, कोणी लहान, कोणी श्रेष्ठ, कोणी कनिष्ठ अशा अनेक भेदांनी समाज विभागलेला दिसतो. परंतु संत तुकाराम महाराज सांगतात की जेव्हा भक्तीची खरी अनुभूती प्राप्त होते; तेव्हा हे सर्व भेद नाहीसे होतात. त्या अवस्थेत मी आणि तो असा भेद राहत नाही. माणूस स्वतःला ईश्वरापासून वेगळे समजत नाही.

अद्वैताची अवस्था

तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने पाहिले, तर ही अद्वैताची अवस्था आहे. उपनिषदांमध्ये अहं ब्रह्मास्मि आणि तत्त्वमसि यांसारख्या महावाक्यांतून आत्मा आणि परमात्मा यांचे एकत्व सांगितले गेले आहे. संत तुकाराम महाराजांनी हेच तत्त्व अत्यंत साध्या आणि लोकभाषेत व्यक्त केले. त्यांनी कोणतेही कठीण शास्त्रज्ञान न वापरता, आपल्या अनुभवातून हे सांगितले की ईश्वर हा दूर नाही; तो आपल्या अंत:करणातच आहे. जेव्हा मनातील अहंकार, मत्सर, द्वेष आणि भेदभाव नाहीसे होतात; तेव्हा माणसाला या एकत्वाची अनुभूती येते.

सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले, तर या अभंगात अत्यंत महत्त्वाचा समतेचा संदेश आहे. समाजात जाती, धर्म, संपत्ती, शिक्षण आणि पद यांच्या आधारे माणसामाणसांत भेद केले जातात. पण संत तुकाराम महाराजांच्या दृष्टीने प्रत्येक जीवात तोच परमेश्वर आहे. म्हणूनच ते म्हणतात की नाहीं पाठीं पोटीं कोणीं दुजें. या विचारातून सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव निर्माण होतो. जर प्रत्येक माणूस दुसर्यामध्येही परमेश्वर पाहू लागला; तर समाजातील द्वेष, अन्याय आणि भेदभाव कमी होऊ शकतो.

फावला एकांत एकविध भाव, हरि आम्हांसवे सर्व भोगी या ओळीत संत तुकाराम महाराजांनी भक्तीतील अंतर्मुखतेचा अनुभव व्यक्त केला आहे. एकांत म्हणजे केवळ जंगलात जाऊन राहणे किंवा लोकांपासून दूर जाणे नव्हे. येथे एकांत म्हणजे मनाची शांत अवस्था होय. जेव्हा मन बाह्य जगातील गोंधळ, लोभ, स्पर्धा आणि अस्थिरतेपासून दूर होते; तेव्हा त्याला खर्या अर्थाने अंतर्मनातील एकांत प्राप्त होतो.

आध्यात्मिक अर्थ

एकविध भाव या शब्दांतून अखंड आणि एकनिष्ठ भक्तीचा अर्थ व्यक्त होतो. सामान्यतः माणसाचे मन अनेक दिशांनी भटकत असते. कधी इच्छा, कधी चिंता, कधी लोभ, कधी भीती अशा अनेक भावनांनी मन व्यापलेले असते. पण जेव्हा मन एकाच भावात म्हणजेच ईश्वरभक्तीत स्थिर होते; तेव्हा जीवनात शांती निर्माण होते. संत तुकाराम महाराजांच्या दृष्टीने हीच खरी समाधी आहे.हरि आम्हांसवे सर्व भोगी या वाक्यात अत्यंत सुंदर आध्यात्मिक अर्थ दडलेला आहे. येथे भोगी या शब्दाचा अर्थ केवळ सुखभोग घेणारा असा नाही. याचा अर्थ असा आहे की जीवनातील प्रत्येक अनुभूतीत हरि सहभागी आहे. दुःख असो वा आनंद, यश असो वा अपयश; प्रत्येक क्षणी परमेश्वर आपल्या सोबत आहे. हा विचार माणसाला जीवनातील संकटांमध्ये धैर्य देतो; कारण त्याला वाटते की तो एकटा नाही.

मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. आधुनिक जीवनात माणूस अनेकदा एकटेपणा आणि मानसिक ताण अनुभवतो. समाजात अनेक नाती असूनही अंतर्मनात रिकामेपणा जाणवतो. अशा वेळी संत तुकाराम महाराजांचा हा संदेश माणसाला अंतर्मनातील आधार देतो. जर माणसाला आपल्या जीवनात ईश्वराची उपस्थिती जाणवली; तर त्याच्या मनातील भीती आणि असुरक्षितता कमी होऊ शकते. तुका म्हणे अंगसंग एके ठायीं, असों जेथें नाहीं दुजें कोणी या शेवटच्या ओळीत संत तुकाराम महाराजांनी भक्तीच्या सर्वोच्च अवस्थेचे वर्णन केले आहे. अंगसंग म्हणजे पूर्णपणे एकरूप होणे. येथे भक्त आणि भगवंत यांच्यातील अंतर संपलेले आहे. ही अवस्था शब्दांच्या पलीकडील आहे. जसे नदी समुद्रात विलीन झाल्यानंतर तिचे स्वतंत्र अस्तित्व राहात नाही; तसेच भक्त परमेश्वरात विलीन होतो.

तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने ही अवस्था सायुज्य म्हणून ओळखली जाते. भक्तिमार्गातील ही सर्वोच्च अवस्था मानली जाते. या अवस्थेत माणूस स्वतःच्या अहंकाराचा पूर्ण त्याग करतो. त्याच्या मनात मीपण उरत नाही. केवळ परमेश्वराची अनुभूती उरते. सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले, तर या विचारात एक अतिशय सुंदर मानवतावादी संदेश आहे. जर माणूस प्रत्येकामध्ये परमेश्वर पाहू लागला, तर तो कोणालाही कमी लेखणार नाही. त्याच्या मनात करुणा, प्रेम आणि सहानुभूती निर्माण होईल. समाजातील अनेक संघर्ष आणि तणाव हे मी आणि माझे या अहंकारातून निर्माण होतात. संत तुकाराम महाराज सांगतात की जेव्हा हा अहंकार नाहीसा होतो; तेव्हा खरी शांती निर्माण होते. आजच्या आधुनिक जीवनात हा संदेश अत्यंत उपयुक्त आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि भौतिक प्रगतीमुळे माणसाचे बाह्य जीवन बदलले आहे; पण अंतर्मनातील अस्वस्थता वाढलेली दिसते. स्पर्धा, असुरक्षितता आणि स्वार्थ यांमुळे माणूस मानसिकदृष्ट्या थकलेला आहे. अशा वेळी संत तुकाराम महाराजांचे हे अभंग माणसाला अंतर्मुख होण्याची प्रेरणा देतात. ते सांगतात की खरे समाधान बाह्य यशात नसून अंतर्मनातील शांततेत आणि परमेश्वराशी असलेल्या नात्यात आहे. या अभंगांमधून संत तुकाराम महाराजांनी भक्तीचा अत्यंत उच्च आणि व्यापक अर्थ स्पष्ट केला आहे.

संत तुकाराम महाराजांचा हा संदेश आजही तितकाच जिवंत आणि प्रभावी आहे. त्यांच्या अभंगांमधील शब्द हे केवळ काव्य नाहीत; तर ते जीवनाला दिशा देणारे विचार आहेत. नाहीं पाठीं पोटीं कोणीं दुजें या भावनेतून समतेचा संदेश मिळतो, हरि आम्हांसवे सर्व भोगी या विचारातून जीवनातील धैर्य आणि विश्वास मिळतो आणि अंगसंग एके ठायीं या अनुभूतीतून आत्मिक शांततेचा मार्ग सापडतो. म्हणूनच संत तुकाराम महाराजांची अभंगवाणी ही प्रत्येक काळात माणसाला अंतर्मनातील प्रकाश आणि शाश्वत समाधान देणारी ठरते.

संत तुकाराम महाराजांच्या अभंगांमधून व्यक्त झालेले विचार हे काळाच्या पलीकडे जाणारे आहेत. त्यांनी मांडलेले तत्त्वज्ञान हे केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक क्षेत्रापुरते मर्यादित नाही; तर ते मानवी जीवनाच्या प्रत्येक स्तराशी जोडलेले आहे. आम्हां आम्ही आतां वडील धाकुटीं, नाहीं पाठीं पोटीं कोणीं दुजें या ओळीतून त्यांनी माणसामाणसांतील भेदभाव नाकारून एकत्वाचा संदेश दिला. ही भावना केवळ भक्त आणि भगवंत यांच्या नात्या पुरती मर्यादित नाही; तर ती संपूर्ण समाजाला समतेची दिशा देणारी आहे.

आजच्या काळात संत तुकाराम महाराजांचे हे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवन सुलभ झाले असले; तरी मानसिक अस्वस्थता आणि सामाजिक तणाव वाढताना दिसतात. अशा परिस्थितीत तुकाराम महाराजांचे अभंग माणसाला अंतर्मनातील शांती, समता आणि आध्यात्मिक स्थैर्याचा मार्ग दाखवतात. त्यांची भक्ती ही अंधश्रद्धेवर आधारित नसून अनुभव, प्रेम आणि आत्मज्ञानावर आधारित आहे.संत तुकाराम महाराजांची अभंगवाणी ही केवळ भक्तिसाहित्य नाही; तर ती जीवनाला दिशा देणारी आध्यात्मिक आणि सामाजिक शाळा आहे. त्यांच्या शब्दांमध्ये माणसाच्या अंतर्मनाला स्पर्श करण्याची विलक्षण ताकद आहे. जेव्हा माणूस स्वतःमधील आणि इतरांमधील परमेश्वराची अनुभूती घेऊ लागतो; तेव्हा त्याचे जीवन अधिक शांत, समतोल आणि अर्थपूर्ण बनते. म्हणूनच संत तुकाराम महाराजांचे हे अभंग आजही प्रत्येकाला आत्मिक समाधान, मानसिक स्थैर्य आणि मानवतेचा खरा मार्ग दाखवणारे दीपस्तंभ ठरतात.



## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

### तणाव कमी करण्यास सहाय्यक



दैनंदिन कामकाजामुळे प्रत्येकाला तणाव येतच असतो. ताबा मिळविण्यासाठी सहवास नेहमीच तणाव कमी करतो,सहवास करतांना प्रेमाचा स्पर्श, गळा भेट, सहवासचा आनंद शरीरात फील गुड हार्मोन शरीरात तयार करतो. यामुळे मनाचा तनाव कमी होत जातो. मनाला शांती मिळते. सहवासने मनाला शांती मिळते, एक दुसऱ्यासोबत भेट झाल्याने तणाव कमी होतो, एक अपूर्व आनंद मिळतो, यामुळे सहवास तणाव दूर करण्यास मदत करतो.

## २ Joke — विनोद




रात्रीच्या काळोखात शिपायाने एकाला विचारले

– थांबा तुम्ही कोण आहात ?

ममी भारतीय आहे.फ

मभारतीय आहात तर भारताचे राष्ट्रगीत म्हणा.फ

ममला येत नाही.फ

मठीक आहे. एवढ्यावरुनच समजले की खरंच तुम्ही भारतीय आहातफ

## ३ Message — संदेश




College me school ki yaad aayi Jawani mai bachpan ki yaad aayi Kanto ko chua to gulaab ki yaad aayi
Aur aaj TV me ek bakri ko dekha to
2mhari yaad aayi.

## ४ Thought — सुविचार

उत्साही असावे पण उतावीळ होऊ नये.




**संस्कृत सुभाषित**

**आरोग्यंभास्करदिच्छेद्धनमिच्छेद्धुताशनात्**
**ज्ञानं महेश्वरादिच्छेन्मुक्तिच्छेज्जनार्दनात्।।**

**अर्थ :** सूर्याकडून आरोग्य मागावे, अग्नीकडून संपत्ती मागावी, शंकराकडून ज्ञान आणि विष्णूकडून मोक्षाची अपेक्षा करावी.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. मृत्यूवर विजय मिळविणारा
४. फायदेशीर, हितावह
७. अवाजवी
१०. संगीतातील एक राग
१२. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना
१४. मला
१५. रसाने भरलेले, उदा.वर्णन
१८. लबाडीचा हेतू
१९. राबता, जाणे-येणे
२१. मऊ
२२. सद्वर्तन
२३. पळसाच्या पानांची संख्या
२४. बेकरीतील एक पदार्थ
२५. लेखणी
२७. उद्याच्या नंतरचा दिवस
२८. नेभळट मनुष्य
३०. प्रत्येकाला त्याच्या कल्पनेनुसार परमेश्वर प्रतीत होतो या अर्थाची उक्ती. '-- -- -- देव!'
३२. एक चर्मवाद्य
३३. वांग्याचा खमंग पदार्थ
३४. तलमसुती कापड
३६. हिंमत, धैर्य
३८. गावातील गप्पाष्टकाची जागा
३९. छोटी बैलगाडी
४१. जन्म
४२. चिनीमातीची वाटी
४२अ. घरटे (संस्कृत)
४४. पत्नी
४५. फणसातील खाद्यभाग
४६. च्या शिवाय
४८. दरवाजा
४९. चंद्र
५०. तबकातील या शूभ्र पदार्थाने वातावरणशुद्धी होते
५१. रामचरित मानस लिहिणारे रामभक्त संत
५४. समाचार
५५. भांडण
५६. नमस्कार
५७. नवे कोरे
५९. कमळ
६१. बासरी
६२. कोलकाताचे विमानतळ
६४. व्रत
६७. टाळ्यांचा आवाज
६८. हिंदीत पाऊल, मराठीतले एक आडनाव
६९. प्रज्वलित, तापलेले

### उभे शब्द

१. हरिण, एक नक्षत्र
२. महाभारताचे मूळ नाव
३. मृत्यूदेवता
५. लवकर, वेगाने
६. बशीचा जोडीदार
७. अभिनेता
८. चणचण
९. अखबार
११. पुरुष
१३. चाणक्यनीती
१४. वर्षाचा बारवा भाग
१६. एक मंगलवाद्य
१७. वीस दस्ते कागद
१९अ. संक्रांतीचे दान
२०. रोखलेली नजर
२२. मनाला टोचणारे दुःख
२५. व्यायाम, परेड
२६. शाकंभरी पौर्णिमेचा मराठी महिना
२७. पुन्हापुन्हा
२८. माळेतील मधला मोठा मणी
२९. दिल्लीचे विमानतळ
३१. निषिद्ध, त्यागलेले
३५. नव्वद अंशाच्या आतील कोन
३६. महासर्प
३७. सिंहाची उपाधी
३८. बसण्याची फळी
४०. झकास, छान
४२. अनाथच्या विरुद्ध
४३. धडक
४४. पोते
४६. गणपतीचे एक नाव
४७. असामान्य, तुलना करता येणार नाही असा
४८. राजा-राणीची सेविका
५२. लाट, झटका, हुक्की
५३. एकूण एक सर्व
५४. कडक व चिवट
५७. दरवाजा
५८. नरमच्या विरुद्ध
६०. एक गळीत धान्य
६१. पवित्र
६३. हत्तीच्या गंडस्थळातील स्राव
६५. तात्पर्य
६६. दुःख, हळहळ

### आडवे उत्तरे

१.मृत्युंजय ४.लाभदायक ७.अवास्तव १०.यमन १२.पसायदान १४.मज १५.रसभरीत १८.कावा १९.वहिवाट २१.नरम २२.सदाचार २३.तीन २४.नानकटाई २५.कलम २७.परवा २८.मेषपात्र ३०.जसा भाव तसा ३२.डमरु ३३.भरीत ३४.मलमल ३६.अवसान ३८.पार ३९.दमणी ४१.जनन ४२.सट ४२अ.कोटर ४४.बायको ४५.गरा ४६.विना ४८.दार ४९.रजनीनाथ ५०.कापूर ५१.तुलसीदास ५४.वार्ता ५५.कलह ५६.नमन ५७.करकरीत ५९.नीरज ६१.पावा ६२.डमडम ६४.वसा ६७.कडकडाट ६८.कदम ६९.रसरशीत

### उभे उत्तरे

१.मृग २.जय ३.यम ५.भरभर ६.कप ७.अदाकार ८.वानवा ९.वर्तमानपत्र ११.नर १३.साम दाम दंड भेद १४.महिना १६.सनई १७.रीम १९अ.वानवसा २०.टक २२.सल २५.कवायत २६.पौष २७.परतपरत २८.मेरुमणी २९.पालम ३१.वर्ज्य ३५.लघुकोन ३६.अजगर ३७.वनराज ३८.पाट ४०.मस्त ४२.सनाथ ४३.टक्कर ४४.बारदान ४६.विनायक ४७.अतुलनीय ४८.दासी ५२.लहर ५३.समस्त ५४.वातड ५७.कवाड ५८.कडक ६०.जवस ६१.पाक ६३.मद ६५.सार ६६.खंत




# शमा जलती रहे तो बेहतर है

राजभूषण सहस्रबुद्धे

टैंक आगे बढें कि पीछे हटें
कोख धरती की बाँझ होती है
फतह का जश्न हो की हार का सोग
जिंदगी मय्यतों पे रोती है

इसलिए ऐ शरीफ इंसानों
जंग टलती रहे तो बेहतर है
आप और हम सभी के आँगन में
शमा जलती रहे तो बेहतर है


जीवनातील युद्धमय प्रसंगातून बाहेर पडून शांतिमय सुखमय जीवन जगण्याची आशा व्यक्त करणारे साहिर लुधियानवी यांच्या कवितेतील शब्द.. इ-ऋक्कऊ-ऊचएडडख (२०२३) या इराकच्या चित्रपटातील व्यथांना न्याय देऊ शकतात का? २००९ चे वर्ष. मध्यपूर्व आखाती प्रदेशातील इराकमध्ये सद्दाम हुसेन या हुकूमशहाची जुलमी राजवट उलथवून तेथे अमेरीकी फौजांनी तळ ठोकून आता ६ वर्षे उलटून गेली. तेथे आता अमेरीकेची दंडेलशाही सामान्य जनांना जाचक ठरत आहे.

राजधानी बगदादमधील गल्लीतील फुटबॉल संघाचा कप्तान १० वर्षांचा हामुदी. मोठे होऊन मेस्सी सारखा विख्यात फुटबॉलपटू त्याला व्हायचं आहे. तो मित्रांबरोबर फुटबॉल खेळत असताना अच-ानक शेजारुन चाललेल्या अमेरीकी अधिकार्यांच्या ताफ्यावर विद्रोहींचा हल्ला होतो. तेव्हा तेथून पळून जाताना भूसुरुंगाचा स्फोट होऊन त्याचा डावा पाय गुडघ्याखाली तुटून पडतो.

आता तो फुटबॉल कसा खेळणार? 'मेस्सी' सारखा महान खेळाडू कसा बनणार? अशी मोठी विवंचना त्या कोवळ्या मनापुढे असतानाच, दवाखान्यात शेजारचा हात गमावलेला वृद्ध त्याच्या मनावर फूंकर घालतो की, घाबरु नको, तुझा पाय हळूहळू पुन्हा झाडाच्या फांदीसारखा वाढेल. या कल्पनेनेच त्याचे दुःखही हळ-ूहळू ओसरत असतानाच अमेरीकी फौजेसाठी दुभाष्याचे काम करतात म्हणजे, देशद्रोही म्हणून त्याचे वडील खादीम यांची शेजार्या पाजार्यांकडून रोज निंदानालस्ती होत असते आणि एके रात्री विद्रोही त्यांच्या घरावर पेट्रोल बाँब टाकतात. त्यात घर जळून राख होते; पण फक्त टीव्ही वाचलेला असतो.

तेव्हा हामुदीचे शिया कुटुंब बगदाद शहर सोडून त्याच्या मावशीकडे सुन्नीबहुल खेड्यात जातात. मावशीचा सुन्नी नवरा युद्धात मारला गेलाय आणि तिची खात्री आहे की, त्याचा शियांच्या फितुरीनेच घात केलाय. गावात भाड्याच्या घरात मासे विक्री टपरीवर गुजराण करावी लागते; पण कशीबशी हाता तोंडाची गाठ पडत असते. पण, हामुदीला कुबड्यांच्या सहाय्याने तेथील स्थानिक फुटबॉल मध्ये खेळायला संधी मिळते; पण गोलकीपर म्हणून. तरी तो त्यात समाधान मानतो.

शिवाय घरात टीव्ही असल्याने सर्वांना फुटबॉल स्पर्धेतील मेस्सीचा खेळही पाहायला मिळतो. परंतु, हे सुख फार काळ टिकत नाही. घराचे भाडे थकले म्हणून, घरमालकाचा बापाला तगादा, मावशीचे आईशी शिया म्हणून वागणे थोडे घुश्श्यातच असते तर, नेमका टीव्ही देखील बिघडतो. टीव्ही दुरुस्त करण्यासाठी बगदादला जाणे परवडणारे नाही. त्यामुळे हामुदीचा हिरमोड होतो. गावाप-ासून दूर ओसाड भागात भूसुरुंगांच्या जोखमीवर युद्धातून मागं राहिलेली हत्यारे शोधून आणायची, असा पैसे कमवायचा एक उपाय घरमालक खादीमला सांगतो. पण, हामुदीचे मित्र त्याला खेळात पुन्हा घेणार नसल्याने टीव्ही दुरुस्तीमुळे तरी पुन्हा घेतील या आशेने हामुदी वडीलांच्या आधीच ओसाड भागाचा नकाशा मिळवून त्या माळरा-नावर भूसुरुंगाच्या ठिकाणी मित्रांबरोबर बेवारस हत्यारे शोधायला जातो आणि तिथे भूसुरुंग स्फोटाच्या जीवघेण्या प्रसंगातून ते अगदी थोडक्यात वाचतात. त्यामुळे त्यांच्यासाठी गा-वात राहणं अवघड बनते. म्हणून दुभाष्याचं काम पुन्हा मिळवण्यासाठी आणि पैसे मिळाल्यावर येताना टीव्हीसुद्धा दुरुस्त करु म्हणून खादीम हामुदीला घेऊन बगदादला जातो. तिथे टीव्ही दुरुस्त करतो, हामुदीला नवा कृत्रिम पाय बसवतो. पण, तेवढ्यात विद्रोहींच्या नजरेत आल्यामुळे खादीमची हत्या होते.




हृदयस्पर्शी कथा

संपूर्ण देश ओसाड माळरानासारखी भूमी, २० वर्षांची जुलुमी हुकूमशाही, धार्मिक कट्टरता, शिया-सुन्नी पंथा पंथा मधील जीवघेणा संघर्ष, सतत आत्मघातकी हल्ले, मानवी जीवनाचे क्षुद्र मूल्य, उदरनिर्वाहाचे प्रश्न, आर्थिक अवमूल्यन आणि शिक्षणाचा अभाव अशा विदारक परिस्थितीत 'हामुदी' हा छोटा मुलगा मेस्सी सारखा महान फुटबॉलपटू होण्याचे स्वप्न बाळगून आहे. ही किती हृदयस्पर्शी गोष्ट आहे.

ती साहीम ओमर खलिफा या नवोदीत परंतु लघुपट, माहितीपटांचा उत्तम अनुभव असलेल्या इराकी (बेल्जियम नागरीक) दिग्दर्शकाने अत्यंत संवेदनशीलतेने सांगितली आहे. हा चित्रपट खलिफाच्या 'बगदाद मेस्सी' याच नावाच्या लघुपटाचं विस्तृत रुप आहे. जो आस्करच्या लघुपटांच्या शर्यतीत अंतिम दहाच्या यादीत पोहोचला होता.

आता पूर्ण लांबीचा चित्रपट बनवताना लघुपटाप्रमाणे हा केवळ एका लहान मुलाचं फुटबाल स्वप्न न राहता युद्धाच्या सततच्या झळांमधून इराकी समाज हामुदीच्या तुटक्या पायाप्रमाणेच अपंग झालाय हे सूचित करतो. 'मेस्सी'चे प्रतिक पंथापंथांमधील विदारक अशा हिंस्त्र वातावरणातील गरीबीसाठी असाध्य असे लक्ष्य म्हणून सादर केलं आहे. 'फुटबालचा खेळ' त्या लहानग्यांसाठी एकात्मता आणि आशावादी भविष्यासाठी वैश्विक साधन म्हणून वापरला आहे. तर, 'टीव्ही' हे त्या स्वप्नातील सुंदर प्रेममय जगाशी जुडणारा दुवा आहे. या सर्व जीवघेण्या परिस्थितीशी टक्कर घेण्याची सामान्य नागरीकांची लढाऊ वृत्तीच त्या छोट्याशा जीवांना भूसुरुंगाचा सामना करण्याचे बळ देते. असा व्यापक वास्तवदर्शी दृष्टीकोन त्याने मांडलाय. लहानपणापासून ऐकलेली वाचलेली बगदादच्या धाडसी 'सिंदबादची कथा' जितकी काल्पनिक आणि अतर्क्य होती, तितकीच बगदादच्या धैर्यशील 'मेस्सीची कथा' वास्तववादी, प्रेरणादायक तरीही रोमांचक झाली आहे. हामुदीचा एक पाय आधीच भूसुरुंगाने तुटलेला असताना दुसरा पायही जेव्हा भूसुरुंगावर पडतो तेव्हा, हृदयाचा ठोका चुकतो. तो प्रसंग खलिफाने खूपच उत्कंठावर्धक आणि थर-ारक बनवला आहे.चित्रपट कथेच्या केंद्रस्थानी असलेल्या १० वर्षांच्या कोवळ्या निरागस हामुदीची भूमिका नवख्या अहमद अब्दुल्लाने तितक्याच समंजसपणे केली आहे. त्याच रोज रात्री पायाची लांबी किती वाढली ते मोजणे हास्यास्पद असले तरी, हृदयाला चीरुन जाते. या स्वप्नरंजनातून जागे करुन वास्तवाची जाणिव करुन देणारी हामुदीची आई लेबनानच्या प्रसिद्ध जाहरा घांदूरने तर, मुलाच्या स्वप्नांना पंख देणारा बाप अथीर आदीलने प्रामाणिकपणे सादर केला आहे.

बेकारीत उपजिविकेची पालकांना विवंचना तर जुन्या डबडा टीव्हीवर मेस्सीचा सामना पहायला मिळत नाही हा हामुदीचा प्रश्न. तो त्याला बघायला मिळावा म्हणून टीव्ही दुरुस्ती आणि फुटबॉल खेळता यावा म्हणून, कृत्रिम पाय त्याला भेट करताच वडिलांचे छत्र डोळ्यादेखत उडून जाताना पाहून सुद्धा त्या मुलाच्या डोळ्यातील अश्रु डोळ्यातच थबकतात. वाहून जाण्याचे ना अश्रुंना धाडस, ना त्यांना वाट करुन देण्याची हामुदी सारख्यांना मुभा. या शेवटच्या प्रसंगात हामुदी पित्याचे कलेवर मी माझ्या खांद्यावरुन आणू शकलो नाही, अशी खंत आईपुढे व्यक्त करताना बघून मन विषण्ण होते. अशी परिस्थिती कुठल्याही बालकावर येऊ नये. कदाचित अशा मन सुन्न करणार्या परिस्थितीत होरपळून निघणारी चिमुकल्यांची ही निरागसता नंतर निश्चितच इतरांना होरपळून काढण्याइतकी क्रूर बनत असावी.

समाज मनाचे विभाजन

ज्यांनी जगाला वेळेचे योग्य विभाजन करुन दिले त्यांचीच वेळ आज बिघडली आहे, त्यांच्या समाजाचे विभाजन झाले आहे. एकेकाळचा खजूराचा प्रमुख उत्पादक, आता 'खजूर में अटके, बरे होते सद्दामचे फटके' या अवस्थेत पोहोचला आहे. अशाच प्रकारे युद्धांमुळे आज जगातील अनेक देशांच्या दयनीय झालेल्या अवस्था पहायला मिळत आहेत. तरी, अजून माणसाची ही खुमखुमी काही मिटत नाही. त्यामुळेच साहीम ओमर खलिफा या सृजकाने संयमितपणे चित्रीत केलेला हा तेलाच्या पेटलेल्या विहीरींचा दाहक थरार मनात काहूर माजवून सोडतो. तर, भेदभावाशी दिव्यांगांचा सकारात्मक लढा नवी ऊर्जा देऊन जातो. हे निश्चित.

धर्म म्हणजेच कर्तव्य, राष्ट्रनिष्ठा, सत्यासाठी युद्ध करण्याची प्रेरणा देणारी आपली भारतियांची ज्ञान संस्कृती असली तरीही ती आपल्याला या स्वार्थासाठीच्या युद्धाचे परिणामांपासून सा-वधही करते. जसा अरण्यामधल्या लाकडांच्यात (झाडे) जन्मलेला वणवा तिथल्या सगळ्या झाडांना जाळून टाकतो, तसेच दुष्ट अन् स्वार्थी लोक युद्धाच्या आगीत आपल्याच लोकांचा, परिवाराचा समूळ विनाश करतात. एवढेच नाही तर धनसंपत्ती, संस्कृती सोबत मानवी जीवनाचा देखील र्हास होतो.

यत्किञ्चिदग्न्यनिलभस्मसात्स्या-
त्कथञ्चिदल्पमपि वर्धमानम्।
तद्वत्कुलीनः पुरुषो दुरात्मा,
नाल्पोऽपि सङ्गेऽवसितोऽवशेप्यः।।



# अभिनेता राजकारणी...

तामिळ चित्रपटसृष्टीचा सेनापती म्हणून ओळखला जाणारा अभिनेता विजय थलापती आज तामिळनाडूच्या राजकारणाचा नवा केंद्रबिंदू ठरला आहे. दशकांपासून चालत आलेले राज्यातील 'द्वि-ध्रुवीय' राजकारण मोडीत काढत, विजयने प्रस्थापित सत्ताकारणाला चकीत केले आहे. अभिनयाचा शिरोमणी आणि भार-तातील सर्वाधिक मानधन घेणारा अभिनेता म्हणून करिअरच्या शिखरावर असताना, चित्रपटसृष्टी सोडून पूर्णवेळ राजकारणात उतरण्याची मोठी जोखीम त्याने पत्करली होती. मात्र, त्याच्या 'तमिळगा वेत्री कळघम' पक्षाने पहिल्याच निवडणुकीत थेट बहुमताच्या आकड्याला गवसणी घालत राज्यातील सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान मिळवला आहे. अभिनेता ते राजकारणी कसा राहिला विजयचा राजकीय प्रवास? या विषयी...घर-ातच अभिनयाचे बाळकडूविजयचे पूर्ण नाव जोसेफ विजय चंद्रशेखर. त्याचा जन्म २२ जून १९७४ रोजी चेन्नई इथे झाला. त्याचे वडील एस. ए. चंद्रशेखर हे तामिळ चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शक तर आई शोभा या एक प्रसिद्ध गायिका आहेत. घर-ातच अभिनयाचे बाळकडू मिळाल्याने विजयने बालवयातच अभिनय क्षेत्रात पदार्पण केले होते.

अठराव्या वर्षी चित्रपटसृष्टीत

विजयचा सिनेप्रवास सोपा नव्हता. १९९२ मध्ये त्याने वयाच्या १८ व्या वर्षी 'नालय्या थीर्पू' या सिनेसृष्टीत पदार्पण केले. सुरुवातीला टीकाकारांनी त्याच्या दिसण्यावरून टीका केली होती, मात्र 'पूवे उनाक्कागा' आणि 'काधलुकु मरियाधई' सारख्या चित्रपटांनी त्याला घराघरात पोहोचवले. २००३ मध्ये आलेल्या 'घिल्ली' चित्रपटाने त्याला खर्या अर्थाने सुपरहिरो बनवले. त्यानंतर त्याने कधीही मागे वळून पाहिले नाही.महागडा अभिनेता-विजयची लोकप्रियता इतकी आहे की, त्याच्या एका चित्रपटासाठी तो तब्बल २०० ते २५० कोटी रुपये मानधन घेतो, असे म्हटले जाते. रजनीकांत यांच्यानंतर तामिळ सिनेसृष्टीला जागतिक स्तरा-वर नेणारा तो सर्वात मोठा अभिनेता ठरला आहे. बॉक्स ऑफिसवर १००-२०० कोटींची कमाई करणे हे त्याच्या चित्रपटांसाठी सामान्य बाब झाली होती. पडद्यावरील राजकीय संकेत

विजयच्या राजकारणातील प्रवेशाची बीजे त्याच्या चित्रपटांतूनच पेरली गेली होती. 'मेर्सल', 'सर्कल' आणि 'सरकार' यांसारख्या चित्रपटांतून त्याने जीएसटी, आरोग्य व्यवस्था आणि भ्रष्ट निवडणूक यंत्रणेवर कडक ताशेरे ओढले होते. या चित्रपटांमुळे अनेकदा राजकीय वाद निर्माण झाले; पण त्यातूनच त्याची राजकीय प्रतिमा तयार होत गेली.मक्कळ इयक्कम ते 'टीव्हीके' विजयने थेट राजकारणात येण्यापूर्वी अनेक वर्षे 'विजय मक्कळ इयक्कम' या आपल्या फॅन क्लबच्या माध्यमातून सामाजिक कार्य केले. गरीब विद्यार्थ्यांना मदत, मोफत भोजन आणि आपत्ती काळात केलेली मदत यांमुळे त्याच्या चाहत्यांचे रूपांतर एका शिस्तबद्ध कार्यकर्त्यांच्या फौजेत झाले. फेब्रुवारी २०२४ मध्ये त्याने अधिकृतपणे 'तमिळगा वेत्री कळघम' या पक्षाची स्थापना केली.वैचारिक भूमिका आणि भवितव्य-विजयने आपल्या पहिल्याच मोठ्या सभेत स्पष्ट केले की, त्याचा पक्ष द्रविडियन मॉडेल आणि राष्ट्रवाद यांचा समतोल राखत धर्मनिरपेक्ष राजकारण करेल. तामिळनाडूच्या राजकारणात प्रस्थापित असलेल्या द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांसारख्या बलाढ्य शक्तींसमोर त्याने एक सक्षम तिसरा पर्याय निर्माण केला आहे. एक्झिट पोल ठरला खरा -सर्व संस्थांनी द्रमुकला बहुमत मिळण्याचा अंदाज दिला असताना ॲक्सिस माय इंडियाचे प्रमुख प्रदीप गुप्ता यांनी विजयच्या पक्षाला आघाडीवर दाखव-ले होते. या पोलनुसार विजयच्या पक्षाला ९८ ते १२० जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला होता. तामिळनाडूत बहुमतासाठी ११८ जागांची आवश्यकता असते, त्यामुळे विजयचा पक्ष स्वबळावर सत्तेवर येऊ शकतो, असे यातून सूचित झाले होते. हा आकडा प्रस्थापित द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोन्ही पक्षांच्या मतांच्या बरोबरीचा किंवा त्यापेक्षा जास्त होता.

# बाप कमावतोय तर कामाची गरज काय?

## ट्रोलरला भाऊ कदमांच्या लेकीचं सडेतोड उत्तर; म्हणाली

मुंबई : मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय विनोद-वीर भाऊ कदम हे प्रेक्षकांचे कायमच आवडते कलाकार राहिले आहेत. 'चला हवा येऊ द्या' आणि 'फू बाई फू'सारख्या कार्यक्रमांतून त्यांनी प्रेक्षकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण केलं. त्यांच्या अभिनयाइतकंच त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल जाणून घेण्यासाठी चाहत्यांमध्ये उत्सुकता असते. भाऊ कदम यांची मुलगी मृण्मयी कदम ही देखील सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असून तिचे व्हिडिओ, व्लॉग आणि पोस्ट्स नेहमी चर्चेत असतात. भाऊ कदम यांच्याप्रमाणेच मृण्मयीला देखील प्रेक्षकांकडून मोठ्या प्रमाणात प्रेम मिळतं.

मुंबई : नाशिकमधील टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांच्या कथित लैंगिक शोषण आणि सक्तीच्या धर्मांतर प्रकरणातील फरार आरोपी निदा खान (छळवर घहरप) हिला अखेर ...

काही दिवसांपूर्वीच मृण्मयीने परदेशातून आपलं ग्रॅज्युएशन पूर्ण केलं. शिक्षण घेत असताना आत्मनिर्भर होण्याची तिची इच्छा होती. त्यामुळे परदेशात शिक्षण घेत असतानाच ती कॅफेमध्ये काम करत होती. अभ्यास आणि नोकरी अशा दोन्ही गोष्टी सांभाळत तिने आपलं शिक्षण पूर्ण केलं. काही दिवसांपूर्वी तिने तिच्या ग्रॅज्युएशन सेरेमनीचे फोटो खपींर-सीरा वर शेअर केले होते. त्या फोटोंमध्ये ती आई-वडिलांसोबत दिसत होती. हे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले. अनेकांनी तिचं कौतुक केलं, तर काहींनी नकारात्मक प्रतिक्रिया देत ट्रोल करण्याचाही प्रयत्न केला. या ट्रोलिंगला उत्तर देण्यासाठी मृण्मयीने स्वतः एक व्हिडिओ शेअर केला. त्या व्हिडिओमध्ये ती म्हणाली की, मी खपींरसीरा वर माझी पोस्ट पाहिली आणि त्यानंतर त्या पोस्टखालील कमेंट्स वाचल्या. मुली बाहेर जाऊन शिकत आ-हेत, स्वतःच्या पायावर उभ्या राहत आहेत, ग्रॅज्युएट होत आहेत, पुढे जात आहेत त्यामुळे काही लोकांचा मेल इगो हर्ट होतो.



सूर्यकुमार यादव कर्णधारपदापासून मुकणार; कोण बनणार भारताचा नवीन कर्णधार, बीसीसीआयची महत्तवाची अपडेट..

इउउख णझऊ-ढए : आयपीएल सुरु आसतानाच भारतीय क्रिकेट नियमक मंडळ (बीसीसीआयने) मोठी अपडेट दिली आहे. यात बीसीसीआयने थिंक-टँकला सुर्यकुमार यादवच्या खराब फॉर्म बद्दल ...

यानंतर तिने काही ट्रोलिंग कमेंट्स वाचून दाखवल्या. एका यूजरने कमेंट केली होती, पैसा असेल तर कुठेही उच्च शिक्षण घेता येतं. यावर उत्तर देताना मृण्मयी म्हणाली, हो, पैसा महत्त्वाचा असतोच. पण मेहनत नावाची गोष्टही असते. देवाने आपल्याला हातपाय दिले आहेत, मग कायम आई-वडिलांच्या पैशांवरच अवलंबून का राहायचं? स्वतः मेहनत करून काहीतरी मिळवण्यात वेगळीच समाधानाची भावना असते.

त्यानंतर तिने आणखी काही कमेंट्स वाचल्या. एका व्यक्तीने लिहिलं होतं, शिक्षणासाठी पैसा महत्त्वाचा असला तरी बुद्धीही लागते. यावर मृण्मयीने उत्तर देताना म्हटलं, जर पैशांनीच सगळं काही मिळत असतं, तर प्रत्येक श्रीमंत व्यक्ती यशस्वी झाली असती. मेहनत आणि स्वतःची जिद्दही तितकीच महत्त्वाची असते.

दरम्यान, एका ट्रोलरने कमेंट केली होती, बाप एवढा कमवतोय तर लेकीला कॅफेमध्ये काम करण्याची काय गरज? यावर मृण्मयीने स्पष्ट शब्दांत उत्तर दिलं. ती म्हणाली, मला आत्मनिर्भर व्हायचं होतं. स्वतः कमावण्याची आणि स्वतःच्या मेहनतीवर उभं राहण्याची मला हौस होती. त्यामुळे मी काम केलं आणि त्याचा मला अभिमान आहे. मृण्मयी कदमच्या या व्हिडिओनंतर सोशल मीडियावर अनेकांनी तिचं समर्थन केलं आहे. अनेकांनी तिच्या आत्मनिर्भर विचारांचं कौतुक करत अशा ट्रोलिंगकडे दुर्लक्ष करण्याचा सल्लाही दिला आहे.

# रशियाच्या दिग्दर्शकाची ऑस्करची बाहुली सापडली

लंडन : रशियाचे दिग्दर्शक पावेल तालानकिन हे ऑस्कर पुरस्काराची बाहुली जर्मनीच्या विमानात विसरल्याची घटना उघडकीस आली आहे. जर्मनीची विमान कंपनी लुफ्तांसाने या बाबीला दुजोरा दिला आहे.विमानात घातक शस्त्रे असल्याचा संशय आल्याने न्यूयॉर्क येथील जॉन एफ. केनेडी विमानतळावरील सुरक्षा यंत्रणांनी सामानांची तपासणी केली होती. तेव्हा गोंधळात ऑस्करची बाहुली हे पावेल विमानातच विसरले होते. ऑस्कर पुरस्कार सोहळा काही दिवसांपूर्वी पार पडला होता.

त्या सोहळ्यात पाशा यांचा मिस्टर नोबडी अगेन्स्ट पुतीन या माहितीपटाला सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा पुरस्कार मिळाला होता. सोहळ्यानंतर न्यूयॉर्क ते फ्रँकफर्ट प्रवासावेळी त्यांची ऑस्करची बाहुली अचानक नाहीशी झाली होती. या पार्श्वभूमीवर लुफ्तांसा विमान कंपनीने शुक्रवारी सायंकाळी माहिती दिली की, ऑस्करची बाहुली मिळाली आहे. फ्रँकफर्ट येथे आमच्याकडे सुरक्षित आहे. ती लवकरच संपर्क साधून दिली जाईल. ऑस्करची बाहुली हरविल्यामुळे पावेल यांना जो मन:स्ताप झाला आहे. त्याबाबत आम्ही त्यांची माफी मागतो.



# आंतरराष्ट्रीय आदिवासी चित्रपट महोत्सवाचे आयोजन

पुणे : आदिवासी जमातींची सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये, बोलीभाषा, चालीरीती आणि कलाविष्कारांचे दर्शन घडविणार्या १९ व्या आंतरराष्ट्रीय आदिवासी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बहुरंगतर्फे आयोजित हा महोत्सव ८ आणि ९ मे रोजी घोले रस्त्यावरील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन येथे सायंकाळी ५ ते ८ या वेळेत पार पडणार आहे.यंदाच्या महोत्सवाचे 'मुसाडा' (लाकडी मुखवटा) हे बोधचिन्ह असून, या महोत्सवाच्या माध्यमातून देश-विदेशी आदिवासी संस्कृतीचा वारसा रसिकांसमोर उलगडला जाणार आहे, अशी माहिती बहुरंग, पुणेचे अध्यक्ष व महोत्सवाचे निमंत्रक डॉ. कुंडलिक केदारी यांनी पत्रकार परिषदेत दिली. कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी राज्यस्तरीय लघुपट, माहितीपट आणि संस्कृती संवर्धन पुरस्कारांचे वितरण केले जाईल. हे पुरस्कार दूरदर्शन व आकाशवाणीचे संचालक इंद्रजित बागल आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांच्या हस्ते प्रदान केले जातील. पुरस्कार सोहळ्यानंतर पल्लियार ट्राईब्स डान्स (तमिळ), ट्रायबल ऑफ जिवती (मराठी) यासह विविध भारतीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट दाखवले जातील.दुसर्या दिवशी 'आदिवासी कला-कलावंत' पुरस्कारांचे वितरण होण-ार आहे. हा महोत्सव सर्व चित्रपट रसिक आणि नागरिकांसाठी विनामूल्य खुला आहे. आदिवासींच्या संगीत, नृत्य, नाट्य आणि रुढी-परंपरांचा हा आगळावेगळा उत्सव अनुभवण्याचे आवाहन डॉ. कुंडलिक केदारी यांनी केले आहे.





# राजा शिवाजी मधील फूल पारिजात गाणं रिलीज

; सईबाई आणि महाराजांच्या नात्यातील प्रेमाची भावूक झलक

मुंबई : जिओ स्टुडिओज आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित 'राजा शिवाजी' (ठक्षर डहळींरक्षळ चेंींळश) या भव्य ऐतिहासिक चित्रपटातील 'फूल पारिजात' (झहेश्र झरीळक्षरीं) हे नवं गाणं रिलीज झालं आहे. छत्रपती शिवाजी महाराज (उहहर-ींररिींळ डहळींरक्षळ चरहरीरक्ष) आणि महाराणी सईबाई (चरहरीरपळ डरळलरळ) यांच्या नात्यातील प्रेम, समर्पण आणि आत्मीयतेची हळवी भावना या गीतातून सुंदररीत्या मांडण्यात आली आहे. युद्धभूमीवर शौर्य गाजवणाऱ्या महाराजांचं कोमल, भावनिक आणि प्रेमळ रूप या गाण्यातून प्रेक्षकांना अनुभवायला मिळत आहे.

इन्स्टाग्रामच्या 'ग्रेट पर्ज २०२६'मुळे खळबळ! विराट, प्रियांका, रोनाल्डोसह अनेक सेलिब्रिटींचे लाखो फॉलोअर्स गायब

मुंबई : सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर एका रात्रीत मोठा बदल पाहायला मिळाल्याने जगभरात खळबळ उडाली आहे. अनेक दिग्गज सेलिब्रिटी (उश-श्रशलीळींळशी) आणि ...



अजय-अतुल (-क्षरू--ींश्र) यांच्या सुरेल संगीताने सजलेलं हे गाणं शांत, भावपूर्ण आणि अभिजात शैलीत साकारण्यात आलं आहे. प्रसिद्ध गायिका श्रेया घोषाल (डहीशूर ऱ्हीहरश्र) यांच्या मधुर आवाजामुळे गीताला आणखी भावनिक स्पर्श मिळाला आहे. गीतातील प्रत्येक शब्द आणि सूर सईबाईंच्या मनातील प्रेम, भक्तिभाव आणि समाधान प्रभावीपणे व्यक्त करताना दिसतो.'फूल पारिजात' या शीर्षकातही एक सुंदर भावार्थ दडलेला आहे. पारिजाताच्या फुलाचं रूपक वापरत सईबाईंच्या आयुष्यात महाराजांचं स्थान एखाद्या दैवी आशीर्वादासारखं असल्याची भावना गीतातून प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे हे गाणं केवळ एक ठोरपींळल डेपस न रा-हता, एका पवित्र आणि आत्मीय नात्याची भाव-पूर्ण अभिव्यक्ती ठरतं.मुलाच्या कबरीजवळ सेलिना जेटलीला अश्रू अनावर; म्हणाली, लग्नाने सर्व काही हिरावलं मुंबई : बॉलिवूड अभिनेत्री सेलिना जेटली (उशश्रळपर गरळींश्र) सध्या आयुष्यातील अत्यंत वेदनादायी आणि कठीण टप्प्यातून जात आहे.

# लातूर शहर महानगरपालिकेचा 'मिशन कर्मयोगी' अंतर्गत राज्यात डंका

- iGOT कर्मचारी/अधिकारी नोंदणी व प्रशिक्षण उपक्रमात महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक
- आयुक्त श्रीमती मानसी यांचा मंत्रालय, मुंबई येथे विशेष गौरव

**लातूर /प्रतिनिधी :** भारत सरकारच्या 'मिशन कर्मयोगी' अंतर्गत राबविण्यात आलेल्या 'महासाधना सप्ताह' (०२ मे ते १० मे २०२६) दरम्यान, ळत्रञ्जढ प्रणालीवरील नोंदणी आणि प्रशिक्षण उपक्रमात लातूर शहर महानगरपालिकेने संपूर्ण महाराष्ट्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. २५० ते १४९९ कर्मचारी/अधिकारी नोंदणी असलेल्या १०१ कार्यालयांच्या गटात लातूर मनपाने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

या दैदीप्यमान यशाबद्दल दिनांक ०८ मे २०२६ रोजी, मुंबई येथील मंत्रालय मुख्य इमारतीतील त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित ढशलह वारी २.० या विशेष कार्यक्रमात लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

साधना सप्ताह २०२६ हा उपक्रम सरकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करून प्रशासकीय कामात गुणात्मक सुधारणा करण्याच्या उद्देशाने राबवण्यात आला. यामध्ये देशातील ९३ हून अधिक केंद्रीय मंत्रालये, सर्व राज्ये आणि २०० हून अधिक प्रशिक्षण संस्थांनी सहभाग नोंदवला होता. या जागतिक स्तरावरील स्पर्धेत लातूर मनपाने आपले स्थान अधोरेखित केले आहे.

या यशाबद्दल बोलताना आयुक्त श्रीमती मानसी आणि उपायुक्त पंजाब खानसोळे यांनी आनंद व्यक्त केला. या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावणारे सिस्टिम मॅनेजर (ई-प्रशासन) प्रवीण इंगळे व त्यांच्या चमूच्या परिश्रमाबद्दल आयुक्तांनी समाधान व्यक्त करून त्यांचे विशेष कौतुक केले.



डिजिटल इंडिया आणि मिशन कर्मयोगीच्या माध्यमातून प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी आमचे कर्मचारी कटिबद्ध आहेत. या पुरस्कारामुळे लातूर मनपाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. असे मत मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी व्यक्त केले.या यशामुळे लातूर शहर महानगरपालिकेचे संपूर्ण महाराष्ट्रात कौतुक होत आहे.

# श्री देशिकेंद्र विद्यालयाच्या १५ विद्यार्थ्यांना १००% गुण;शाळेचा निकाल ९९.७२%

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या इयत्ता दहावीच्या निकालात लातूरच्या महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेद्वारा संचलित श्री देशिकेंद्र विद्यालयाने आपले परंपरागत वर्चस्व कायम राखत उत्तुंग यश संपादन केले आहे. शाळेचा एकूण निकाल ९९.७२ टक्के लागला असून, तब्बल १५ विद्यार्थ्यांनी १००% गुण मिळवून नवा इतिहास रचला असून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

यावर्षी विद्यालयाचे एकूण ७२८ विद्यार्थी या परीक्षेस सामोरे गेले होते, त्यापैकी १५ विद्यार्थ्यांनी १००% गुण मिळविले असून ९०% पेक्षा ७२६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शिवाय,२५७ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह ,प्रथम श्रेणीत १७३, द्वितीय श्रेणीत ५७ तर तृतीय श्रेणीत १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.विद्यालयाच्या तब्बल १५ विद्यार्थ्यांनी १००% गुण मिळवून नवा इतिहास घडविला असून विद्यालयाचा या निकालातील दबदबा कायम राखला आहे.१००% गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांत राजवर्धन इंगळे,कु. स्वरा शिंदे ,कु.श्रेया अंतुरे ,समर्थ कुरूम ,कु.वैष्णवी मुडबे, रितेश मोटे,कु.अदिती चव्हाण,स्वप्निल येरमे,कु.अनुष्का कुसंगे, कु.ज्ञानेश्वरी माने,कृष्णा शिंदे,विवेक शिंदे,कु.मृगा आनेराव,कु.गौरी आनेराव,कु. आश्लेषा बिरादार यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांकडून केली जाणारी विशेष तयारी,विद्यार्थ्यांची जिद्द आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले ,असे विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी कोळी यांनी सांगितले. संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनिल मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक बसवराज येरटे व सर्व संचालक, मुख्याध्यापक शिवाजी कोळी, उपमुख्याध्यापक शिवानंद स्वामी ,सर्व पर्यवेक्षक,सर्व शिक्षक -शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## विलासराव देशमुख फाउंडेशनच्या ४४ विद्यार्थ्यांची नामांकित फार्मा कंपन्यांमध्ये निवड




**लातूर/प्रतिनिधी :** ८ मे २०२६ येथील विलासराव देशमुख फाउंडेशन, स्कूल ऑफ फार्मसीमधील बी. फार्मसी आणि एम. फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'कॅम्पस ड्राइव्ह'मध्ये ४४ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते. नामांकित कंपन्यांचा सहभाग झाला या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये पुणे आणि गोव्यातील आघाडीच्या फार्मा कंपन्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये एजीआयवो फार्मास्युटिकल प्रायव्हेट लिमिटेड, पुणे, एवरसुअर पॉलीबॉंड फार्मा प्रायव्हेट लिमिटेड, पुणे, जेनो फार्मा प्रायव्हेट लिमिटेड, गोवा या कंपन्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर आधारित निवड करण्यात आली. या मोहिमेत १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. बी. एस. वाकुरे यांनी सांगितले की, महाविद्यालयात दरवर्षी नियमितपणे आयोजित केल्या जाणाऱ्या अशा कॅम्पस मुलाखतींमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना थेट नामांकित कंपन्यांमध्ये संधी उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या करिअरला योग्य दिशा मिळत आहे. या मुलाखत प्रक्रियेत मानव संसाधन अधिकारी माधव साखरे, ज्ञानेश्वर घाटोळे, संतोष स्वामी, गणेश कांबळे यांनी विद्यार्थ्यांची निवड केली.

यावेळी ट्रेनिंग व प्लेसमेंट ऑफिसर प्रा. गादा एस. एन., प्राचार्य डॉ. बी. एस. वाकुरे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष, माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख आणि संचालक मंडळाने अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. गादा एस. एन., डॉ. साळुंके एम. ए. व सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## राजमाता जिजामाता विद्यालयाचा ८५ टक्के निकाल



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १०वी परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. यात राजमाता जिजामाता विद्यालयाने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली असून विद्यालयाचा निकाल ८५ टक्के लागला आहे.

अक्षरा गुलाबराव राऊत ही विद्यार्थिनी ९५.२० टक्के गुण मिळवून विद्यालयातून प्रथम, रोहिणी बालाजी कांबळे ९३.८० टक्के गुण मिळवून द्वितीय, तर प्रताप दादाराव किर्जत ८९ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. विद्यालयातील ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून २४ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. तर गणित विषयात रोहिणी बालाजी कांबळे या विद्यार्थिनीला ९७ गुण प्राप्त झाले आहेत.

या यशाबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, शिक्षण उपसंचालक दीपक चवणे, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, मुख्याध्यापक संगमेश्वर केंद्रे, संस्था सदस्य उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, करिश्मा केंद्रे, पर्यवेक्षक एस. एम. गुरमे, समन्वयक राजीव मुंढे, पांडुरंग कुलकर्णी, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर आदींनी कौतुक केले आहे.

## तुळजाभवानी विद्यालयाचा ८० टक्के निकाल

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १०वी परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला आहे. यात तुळजाभवानी माध्यमिक विद्यालयाने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली असून विद्यालयाचा निकाल ८० टक्के लागला आहे.

# अहिल्यादेवी होळकर पुतळा सुशोभीकरण कामाची धिरज देशमुख यांच्याकडून पाहणी

**लातूर/प्रतिनिधी :** लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा व विचारांचा गौरव जपणाऱ्या नवीन रेणापूर नाका, लातूर येथील पुतळा सुशोभीकरणाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी केली. हे काम जिल्हा बँकेच्या माध्यमातून सुरू असून परिसर अधिक आकर्षक व प्रेरणादायी करण्याच्या दृष्टीने विविध कामे करण्यात येत आहेत.

यावेळी धिरज देशमुख यांनी संबंधित अधिकारी व काम करणाऱ्या प्रतिनिधींना आवश्यक त्या सूचना देत काम अधिक दर्जे दार, आकर्षक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याबाबत मार्गदर्शन केले. रेणापूर नाका परिसरातील हे स्मारक सुशोभीकरणाच्या माध्यमातून अधिक सुंदर, देखणे आणि नागरिकांसाठी प्रेरणादायी स्वरूपात साकारत असून भविष्यात हे ठिकाण शहराच्या अभिमानाचे केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या पाहणी दौऱ्यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, रेणा कारखान्याचे माजी चेअरमन सर्जेराव मोरे, लातूर पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, विष्णुदास धायगुडे आदींची उपस्थिती होती.



# सरस्वती विद्यालयाची एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत गरुड झेप

**लातूर/प्रतिनिधी :** मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी.बोर्ड परीक्षेत सरस्वती विद्यालयाने उत्तुंग यश संपादन केलेले आहे. विद्यालयाचा एकूण शेकडा निकाल ९८.७८ % इतका लागला असून विद्यालयातून ०२ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० टक्के गुण प्राप्त केलेले आहेत. विद्यालयातून एकूण ५७६ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झालेले होते, त्यापैकी ५६९ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. विद्यालयातून सर्वप्रथम चि. पठाण सुमान नामदार - १००%, कु.सय्यद तझिम मुज्जफर - १०० %, सर्वद्वितीय कु.म्हेत्रे वैष्णवी लक्ष्मण - ९९.८०% व चि.काळे विश्वजित अप्पासाहेब - ९९.८०% आणि सर्वतृतीय चि.लवांडे वेदांत मारुती - ९९.२०%, चि.पलमटे केशव गोविंद - ९९.२०% ,चि. सुरवसे पार्थराजे शंकर - ९९.००% आलेले आहेत. ९० % पेक्षा अधिक गुण प्राप्त करणारे एकूण ११८ विद्यार्थी आहेत.




सरस्वती विद्यालयाच्या एकूण निकालामध्ये विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण - ३१२ विद्यार्थी, प्रथम श्रेणी मध्ये - १६७ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी मध्ये - ७५ विद्यार्थी तर तृतीय श्रेणी मध्ये - १५ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. यावेळी १००% गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा विद्यालयात सत्कार करण्यात आला.या प्रसंगी संस्थेचे सर्व संचालक मंडळ, विद्यालयाचे मुख्य ाध्यापक,उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक व परिसरातील नागरिक उपस्थित होते. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे बालविकास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री.बी.के.सूर्यवंशी, उपाध्यक्ष तथा शालेय समितीचे अध्यक्ष श्री.सी.के.साळुंके, सचिव ॲड. श्री.एल.ई.भागवत, कोषाध्यक्ष श्री.डॉ. आर.एन.लटूरीया, , श्री.जे.बी.नाडे, संचालक श्री.डी.बी.माने, संचालक श्री.एस.एस.चपटे, श्री.एस.जी.पाटील, श्री.एस.व्ही.पाटील, श्री.प्रविण राठी तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.चंद्रकांत प्रभू साळुंके, सदस्य श्री.सूर्यकांत यादव, श्री.अविनाश चव्हाण, मुख्याध्यापक श्री.एच.एस.गवळी, उप मुख्याध्यापक श्री.पी.बी. माने, पर्यवेक्षक श्री.एच.आर.राठोड, श्री.एस.एन.मानकोसकर, परीक्षा विभाग प्रमुख श्री.एस.व्ही.इळेगावकर, श्रीमती एस.व्ही.जोशी,सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री.शामराव लवांडे, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, परिसरातील पालक व नागरिक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे आभिनंदन केले.

## इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित ,दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय,लातूर येथे दिनाक ०८ मे २०२६ रोजी फेब्रुवारी /मार्च २०२६ इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेत महाविद्यालयाचा निकाल ९१.१२ टक्के लागला असून एकुण १३५ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले आहेत.महाविद्यालयातून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवून गुणवता यादीत येणारे ,९० टक्के पेक्षा जास्त गुण संपादन करणारे आणि विषयात १०० पैकी १०० गुण व २०० पैकी २०० गुण घेणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय समिती अध्यक्ष तथा दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री.रमेशकुमारजी राठी उपस्थित होते. तसेच दयानंद शिक्षण संस्था अध्यक्ष मा श्री. लक्षीरमणजी लाहोटी ,सचिव मा.श्री रमेशजी बियाणी आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर , कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी प्रा.ऋतुजा देशमुख, समन्वयक डॉ. सुभाष मोरे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयातून प्रथम चि.प्रथमेश मोगल यास रु १००००, द्वितीय चि . शहाण शेख यास रु.५००० आणि तृतीय चि . अश्विन बजाज यास रु.३००० रोख पारितोषिक दयानंद शिक्षण संस्थेमार्फत गुणवंत शिष्यवृत्ती म्हणून देण्यात आली.विषयात १०० पैकी १०० गुण व २०० पैकी २०० गुण मिळवले अशा विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.१००० रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला.

# आलमला ब्ल्यू बर्ड स्कुलचा सलग पाचव्या वर्षी १०० टक्के निकाल

**औसा/प्रतिनिधी :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता १० वी चा निकाल जाहिर झाला असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कुल, आलमला या शाळेचा निकाल सलग पाचव्या वर्षी १०० टक्के लागला असून निकालाची परंपरा कायम राखली आहे.

सदरील शाळेतील लटुरे चैतन्य प्रल्हाद हा विद्यार्थी ९५.६० टक्के गुण घेऊन सर्वप्रथम आला आहे, देशमुख असिन हबीब ९०.२० टक्के गुण घेऊन द्वितीय आली आहे तर ८९.६० टक्के गुण घेऊन मनगुळे गौरवी शिवानंद ही विद्यार्थीनी तृतीय आली आहे. तसेच शाळेतील १४ विद्यार्थी हे ८० टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत तर २३ विद्यार्थी हे प्रथम श्रेणीत उत्त्तीण झालेले आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक तानाजी जाधव व सौरभ वडे, मंजूरपाशा शेख, सोहेल शेख, यास्मीन फाजल, फिरदोस सय्यद, हबीब सय्यद, विशाल चव्हाण, नितू भंडारी, ममता बोकडे, परमेश्वर चिलखे, विनोद पांडुळे, रश्मी दुधनकर, सुप्रिया जाधव, पायल सुर्यवंशी, गीता चौहान, श्रीदेवी कवठे इत्यादी शिक्षकांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

## श्री किशन सोमाणी विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी पटकावले १०० टक्के गुण

### विद्यालयाच्या ९२ विद्यार्थ्यांनी पटकावले ९० टक्के पेक्षा जास्त गुण




**लातूर/प्रतिनिधी :** येथील अभिनव मानव शिक्षण संस्था द्वारा संचालित श्री किशन सोमाणी विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण संपादन केले आहेत. तर ८८ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण संपादन केले आहेत. मागच्या १५ वर्षांपासून विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची दैदिप्यमान परंपरा कायम राखली आहे.

श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या समर्थ कल्याण गिरवलकर,अथर्व संतोष मरे , अनुराग नेताजी सावंत आणि अथर्व राजाराम कात्रे या चार विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. विद्यालयाच्या एकूण १९३ विद्यार्थ्यांपैकी १५८ विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता संपादन करण्यात यश मिळवले आहे. संस्कृत, गणित आणि विज्ञान, इतिहास भूगोल या विषयात अनुक्रमे ३२, ०२, ०१ आणि ०१ विद्यार्थ्यांनी १०० गुण संपादन केले आहेत. विद्यालयातील ९२ विद्यार्थ्यांनी ९० ते ९९. ९ टक्के गुण परंपरा केले आहेत. ६६ विद्यार्थ्यांनी ७५ ते ८९. ९ टक्के , २७ विद्यार्थ्यांनी ६० ते ७४. ९ टक्के तर ७ विद्यार्थ्यांनी ४५ ते ५९. ९ टक्के गुण मिळवले आहेत. विद्यालयाचा त्यावर्षीचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल ९९. ४८ टक्के लागला आहे. मागील १५ वर्षांपासून श्रीकिशन सोमाणी विद्यालयाने दहावीच्या निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समिती अध्यक्ष अतुल देऊळगावकर, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनिता जाधव, राहुल पांचाळ यांसह सर्व शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## जयक्रांती सेमी इंग्लिश स्कूल लातूर चा ड्ड्ड मार्च २०२६ परीक्षेत ९७.०५% निकाल

**लातूर/प्रतिनिधी :** मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी परीक्षेत जयक्रांती सेमी इंग्लिश स्कूल लातूर चा ९७.०५% टक्के निकाल लागला. विशेष प्राविण्यामध्ये १७ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.प्रथम श्रेणी मध्ये १८ द्वितीय श्रेणी मध्ये २१विद्यार्थ्यांनी यश मिळवले.विद्यालया मध्ये प्रथम क्रमांक चि.आयुष सिंदीकुमठे ९६.८०% गुण प्राप्त करून मिळवला. द्वितीय चि. रिहान शेख ९६.२०% तृतीय चि.पुरुषोत्तम कांबळे ९५. २० % चतुर्थ क्रमांक कु.नंदिनी घंटे ९४.२०% तर पाचवा क्रमांक चि.पियुष कुलकर्णी ९३.४० % गुण प्राप्त करीत मिळवला. नव्वद टक्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करणारे एकुण आठ विद्यार्थी आहेत. या यशाबददल गुणवंत विदयार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यशस्वी व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा संस्थेचे सचिव प्रा.गोविंदराव घार,अध्यक्ष बालाजी घार, प्राचार्य प्रशांत घार,पर्यवेक्षक तानाजी घाटके यांनी सत्कार केला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ गणपत माने,नंदकिशोर माळी, गिरीष रंदाळे,डॉ.सुशिल शिंदे,संभाजी वारकड, संगमेश्वर भेंडेगावे,अमर येळंबकर,विश्वनाथ सिंधीकुमठे,नीता तांभाळे,गीता पाटील,रामदास लातूरे, गजानन घोंगडे,संकेत बनसोडे,नंदकिशोर थंबा, अमोल पवार,आकाश लोहार यांनी अभिनंदन केले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# लातूर शहरात 'महाराजस्व अभियान' उत्साहात; विविध शासकीय योजनांचा २ हजार नागरिकांनी घेतला लाभ



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत लातूर शहरासाठी गिरवलकर मंगल कार्यालय येथे समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, प्रभारी गटविकास अधिकारी सतीश चोरमले, नगरसेवक सतीश साळुंके आणि फिरदोस अरीफ शेख-साकोळकर यांच्यासह विविध विभागांचे तालुकास्तरीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरामध्ये एकूण १२ विभागांचे स्टॉल्स उभारण्यात आले होते, ज्याद्वारे नागरिकांना विविध शासकीय सेवा आणि योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत प्रलंबित बँक केवायसी पूर्ण करण्यासोबतच नवीन अर्जांसाठी मार्गदर्शन करण्यात आले, तर पुरवठा विभागामार्फत डिजिटल रेशन कार्डचे वाटप आणि दुरुस्तीबाबत माहिती देण्यात आली. महसूल विभागाने नागरिकांना जिवंत व डिजिटल सातबाराचे विनामूल्य वाटप केले, तसेच रहिवासी, उत्पन्न आणि जातीच्या प्रमाणपत्रांचे नवीन अर्ज स्वीकारले. भूमी अभिलेख विभागामार्फत लातूर मंडळातील ७ गावांचे नकाशे संबंधित ग्रामपंचायतींना सुपूर्द करण्यात आले असून पी.आर. कार्ड आणि मोजणीबाबत माहिती देण्यात आली. कृषी विभागाने पी.एम. किसान, महाडीबीटी आणि 'महाविस्तार-AI' ॲप यांसारख्या आधुनिक योजनांची माहिती दिली, तर आरोग्य विभागाने आयोजित केलेल्या विशेष कॅम्पमध्ये रक्ताची व रक्तदाब तपासणी करण्यासोबतच 'आयुष्मान भारत' आणि 'महात्मा फुले जन आरोग्य' योजनेविषयी माहिती देण्यात आली. महावितरण विभागाने 'मागेल त्याला सोलर' आणि 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज' योजनेसाठी नागरिकांकडून अर्ज भरून घेतले. महिला व बाल विकास विभागामार्फत लेक लाडकी योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना आणि बेबी केअर किटबाबत मार्गदर्शन करून गरोदर मातांना आहार योजनेची माहिती देण्यात आली. याशिवाय घरकुल योजना आणि वन विभागाच्या योजनांचे स्टॉल्सही नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले. एकूण १६५ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले, शहरातील सुमारे २ हजार नागरिकांनी या अभियानात सहभाग नोंदवला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवासी नायब तहसीलदार गणेश सरोदे यांनी केले.

# मोहन महाराज यांचे वाढदिवसा निमित्त १२६ वे रक्तदान



**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री संतोषी माता भक्त मोहन महाराज यांनी शुक्रवारी आठ मे २०२६ रोजी आपल्या वाढदिवसानिमित्त रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. हत्ते नगर रोड नंबर चार लातूर येथील श्री संतोषी मातेचे भक्त मोहन महाराज खंडेलवाल हे गेली अनेक वर्षापासून आपला वाढदिवस रक्तदानाने साजरा करत आले आहेत. शुक्रवारी त्यांनी येथील भालचंद्र रक्तपेढीत जाऊन १२६ वे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. मोहन महाराज यांनी आज पर्यंत अनेक गरजू आर्थिक दुर्बल व्यक्ती, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, कपडे, भांडी, संसार उपयोगी साहित्य इत्यादीची मदत देऊन वेगळेपण सिद्ध केले आहे. १२६ वे रक्तदान केल्यामुळे त्यांच विविध स्तरातून अभिष्टचिंतन होत आहे.

# साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेत ९९ टक्के निकाल

**लातूर/प्रतिनिधी :** अवंती नगर, लातूर येथील साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावी बोर्ड परिक्षा मार्च-२०२६ चा निकाल ९९.०० टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या यशस्वी निकालाची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत विद्यालयातून महेश मोहन मरसोने याने ९७.०० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अनुकल्प तुकाराम लोणे याने ९५.८० टक्के गुणांसह द्वितीय तर बुशरा इम्रानपाशा शेख हिने ९४.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच मारोती महादेव जाधव (९३.८०%), सुशांत सुधाकर राठोड (९३.२०%), महेश्वरी बालाजी आलुरे (९१.४०%), प्रांजली नामदेव सूर्यवंशी (९१.२०%), प्रशांत राजेश नांदुरे (९०.८०%), अभय राम गुडले (९०.८०%), श्रद्धा संभाजी बुगनर (९०.४०%), गणेश गोपीनाथ ठाकूर (९०.४०%) आणि प्राची दादाराव सालगुडे (९०.२०%) यांनीही उल्लेखनीय यश मिळविले. विद्यालयातील ९० ते १०० टक्के गुणांच्या श्रेणीत १२ विद्यार्थी मेरीटमध्ये आले असून ८० ते ९० टक्के दरम्यान ५० विद्यार्थी तसेच ७० ते ८० टक्के दरम्यान ८५ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. सातत्यपूर्ण गुणवत्ता, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळे विद्यालयाने यंदाही उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.

# दहावी बोर्ड परीक्षेत 'केशवराज'चे घवघवीत यश



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेत श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले असून विद्यालयाचा निकाल ९९.७२ टक्के लागला आहे. या परीक्षेत विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली असून विद्यालयातील २२० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत. यातील ०९ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण प्राप्त केले आहेत. तर विशेष प्राविण्यता मिळवणारे एकूण ५१४ विद्यार्थी आहेत. १०० टक्के गुण घेणारे विद्यार्थी स्वराज शिंदे, साईनाथ सुरवसे, श्रावणी चव्हाण, शिवम चाटे, वेदांत शेळगे, पृथा इटोलीकर, सार्थक मुचुटे, आदित्य गरड व अथर्व लोंढे हे आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते पेढे देऊन अभिनंदन करण्यात आले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, राम कुलकर्णी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, सदस्य नरेंद्र पाठक, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी, दहावी प्रमुख अर्चना ठोंबरे, सहप्रमुख लक्ष्मण गिराम तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





# रहेमानिया उर्दु हायस्कूल कासार सिरसी शाळेचा निकाल १०० %

**निलंगा/मोईज सितारी :** माध्यमिक व उच्च माध्यमिक व प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत रहेमानिया उर्दू हायस्कूल कासार सिरसी. शाळेचा १० वी चा निकाल १०० % टक्के लागला. शाळेत पटेल महेक दस्तगीर हिने ७६.४० % टक्के घेऊन प्रथम आली तर पटेल फिजा सय्यद अहेमद हिने ७४ % घेऊन द्वितीय आली तर शेख रुबीना शमशोद्दीन हिने ७३.४० % घेऊन तृतीय आलीं. संस्थेचे अध्यक्ष हाजी मजूर अहेमद देशमुख, सचिव अल हाज फारुख अहेमद देशमुख, संचालक शफीक अहेमद देशमुख, सर्व संचालक मंडळ, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# वाले इंग्लिश स्कुलचा एस. एस. सी. परीक्षेत 100% निकाल

**लातूर/प्रतिनिधी :** नुकत्याच जाहीर झालेल्या इ.१०वी च्या निकालात वाले इंग्लिश स्कुलचे ८६ विद्यार्थी बसले होते व ते सर्व उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले. ३१ विद्यार्थ्यांना ९०% च्या पुढे गुण असून देशमुख सिध्दिराज १००% गुण घेऊन प्रथम आला. तर काळे कादंबरी किरण ९९.८०% गुणांसह द्वितीय आणि शेख माझ ९९.६०% गुण घेत तृतीय आला, देशमुख वेदांतिका ९८.६०% गुणांसह चौथी तर निटूरे हिमांशू ९८.००% गुणांसह पाचव्या स्थानी आला. ५५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह (७५% - ९०%) उत्तीर्ण झाले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव मकरंद सावे, कोषाध्यक्ष श्री. शांतीकुमार कुचेरिया, सदस्य शिवशंकर बिडवे, झकीखान कायमखानी, संदीप सावे, सौ. ममता सावे, प्राचार्य भोगडे सर, उपप्राचार्य बाकलीकर सर, पर्यवेक्षिका सौ. धाराशिवकर मॅडम, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीवृंदाने अभिनंदन केले.

# सुखी आणि आनंदी जीवनासाठी कुटुंबात संवाद महत्वाचा : शरद झरे

**लातूर/प्रतिनिधी :** आज समाजामध्ये मोठ्या प्रमाणात कौटुंबिक संघर्ष आपल्याला बघायला मिळतो. कौटुंबिक सौख्य निर्मितीत कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सध्याच्या धकाधकी आणि स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येक व्यक्ती हा वैयक्तिक स्वार्थ जपण्यामध्ये मग्न आहे परंतु समाजात सुखी आणि आनंदी जीवनासाठी कुटुंबात संवाद महत्वाचा आवश्यक असल्याचे प्रतिपादन माझं घर प्रकल्पाचे प्रमुख सामाजिक कार्यकर्ते शरद झरे यांनी केले. माझं घर प्रकल्प, बुधोडा येथे ५८ वा मंगल परिणय दिन, सामाजिक कार्यकर्ते शरद झरे जन्मदिन आणि सार्थक गवई सत्कार अश्या तीन आनंददायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर धारशिवचे दैनिक पुढारीचे पत्रकार रहीम शेख, दुर्वासराव गवई, निर्मला गवई, संगीताताई झरे, डॉ.संजय गवई आणि ममता गवई यांची प्रमुख उपस्थिती होती.

## कर्मवीर भाऊराव ..

रयत शिक्षण संस्था
साक्षात ज्ञानाचादिवा
शिक्षणहक्क सर्वांचा
भेदभाव कशास हवा

शिक्षणघेताना कमवा
ज्ञान शलाका जमवा
स्वावलंबी व्हावे सदा
कर्मयोगा स्वता रमवा

मार्ग दाखविला नवा
शिक्षणअख्ख्या गावा
आल्हाद दायक छान
वाहता साक्षरता हवा

ज्ञान खुले सर्वां साठी
कशाला डावा उजवा
सारे समान सारखेचं
पावसासमान भिजवा

वटवृक्षा सम विस्तार
पान्थस्था देतो गारवा
पारंब्या बने खोड मुळे
भुमीशी नाते रूजवा

सूर्य होणे जरी कठीण
बनावे निदान काजवा
शिक्षीत मानव आपण
सुखानंदे डंका वाजवा

वटवृक्षासमान दिर्घायु
प्रसार प्रचार असावा
अभिनंदन अभिवादन
पद्म भुषण भाऊरावा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# जनगणना २०२७: नागरिकांसाठी १५ मे पर्यंत 'स्व-गणना' करण्याची संधी

भारताची जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर नागरिकांना 'स्व-गणना' (Self-Enumeration) हा सुलभ पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. लातूर जिल्ह्यातील नागरिकांना १ मे ते १५ मे या कालावधीत स्वतःच्या कुटुंबाची माहिती स्वतः ऑनलाईन नोंदवता येणार आहे. या प्रक्रियेसाठी एक सर्वसमावेशक प्रश्नावली तयार केली असून, त्यामध्ये कुटुंबाच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा वेध घेणारे विविध प्रश्न समाविष्ट आहेत.

या प्रश्नावलीची सुरुवात कुटुंब प्रमुखाचे नाव आणि मोबाईल क्रमांकापासून होते. यामध्ये घराच्या बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याचा सविस्तर तपशील विचारण्यात आला आहे, ज्यामध्ये जमिनीसाठी माती, विटा, सिमेंट किंवा टाईल्स , भिंतींसाठी दगड, कच्च्या विटा किंवा कॉंक्रीट , आणि छप्परासाठी कौले, लोखंडी पत्रे किंवा कॉंक्रीट यांपैकी कोणत्या साहित्याचा मुख्यत्वे वापर झाला आहे याची नोंद करावी लागेल. घराचा वापर केवळ निवासासाठी होतो की व्यवसाय, शिक्षण किंवा आरोग्य सेवांसाठी, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. तसेच, घराची सद्यस्थिती राहण्यायोग्य आहे की मोडकळीस आली आहे, यावरही कुटुंबांनी माहिती द्यायची आहे.

कुटुंबातील सदस्यांच्या माहितीमध्ये एकूण संख्या, लिंग (पुरुष, स्त्री, किंवा ट्रान्सजेंडर) आणि सामाजिक प्रवर्ग (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा इतर) यांचा समावेश आहे. घराच्या मालकी हक्काबाबत माहिती देताना ते स्वतःचे आहे की भाड्याचे, हे नमूद करावे लागेल. कुटुंबाच्या राहणीमानाचा स्तर तपासण्यासाठी निवासयोग्य खोल्यांची संख्या आणि विवाहित जोडप्यांची संख्या विचारली गेली आहे. मुलभूत सुविधांमध्ये पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत जसे की प्रक्रिया केलेले नळ पाणी, विहीर, कूपनलिका किंवा टँकर आणि त्याची उपलब्धता किती अंतरावर आहे, याची नोंद करणे बंधनकारक आहे. प्रकाशासाठी वीज किंवा सौर ऊर्जेचा वापर होतो का, हे देखील स्पष्ट करावे लागेल.

स्वच्छतेच्या दृष्टीने प्रश्नावलीत महत्त्वाचे प्रश्न आहेत. कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालय आहे की ते सार्वजनिक सुविधेचा वापर करतात, तसेच शौचालयाचा प्रकार (फ्लश, सेप्टिक टँक किंवा इतर) कोणता आहे, याची माहिती द्यावी लागेल. सांडपाणी निचऱ्यासाठी बंद किंवा उघड्या गटारांची व्यवस्था आणि स्वतंत्र स्नानगृहाची उपलब्धता याबाबतही प्रश्न विचारण्यात आले आहेत. स्वयंपाकासाठी एलपीजी/पीएनजी जोडणीची उपलब्धता आणि इंधन म्हणून लाकूड, रॉकेल, वीज किंवा बायोगॅस यांपैकी कशाचा वापर होतो, हे देखील कुटुंबांना नमूद करावे लागेल.

डिजिटल इंडियाच्या काळात कुटुंबांकडे उपलब्ध असलेल्या आधुनिक साधनांची माहितीही या जनगणनेत संकलित केली जात आहे. यामध्ये रेडिओ, दूरचित्रवाणी (डिश किंवा केबल), लॅपटॉप, संगणक आणि इंटरनेट सुविधेची उपलब्धता (मोबाईल किंवा अन्य उपकरणांवर) या गोष्टींचा समावेश आहे. तसेच कुटुंबाकडे सायकल, दुचाकी किंवा चारचाकी वाहन आहे का, याचीही नोंद घेतली जाईल. शेवटी, कुटुंबात प्रामुख्याने सेवन केले जाणारे धान्य जसे की तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी किंवा मका याविषयी माहिती विचारण्यात आली आहे. १५ मे पर्यंत जास्तीत जास्त नागरिकांनी या स्व-गणना सुविधेचा वापर करून राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

# जनकल्याण निवासी विद्यालयाचा शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचा १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**लातूर/प्रतिनिधी :** येथील जनकल्याण निवासी विद्यालयाने शालान्त प्रमाणपत्र परीक्षेच्या निकालात यंदाही १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातील ३३ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केले, तर ५२ विद्यार्थ्यांनी ७५ ते ९० टक्क्यांदरम्यान गुण संपादन केले आहेत. या परीक्षेसाठी विद्यालयातील एकूण ९४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ८५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयातील चि. दीपक दिनकर ठोंबरे याने ९९.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. कु. नेहा रविंद्र घाडगे हिने ९७ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तसेच चि. प्रथमेश संजय गड्डीमे व चि. आर्यन दत्तात्रय दिवाणे यांनी ९५.८० टक्के गुण मिळवून संयुक्तरीत्या तृतीय क्रमांक पटकाविला.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे तसेच दहावी प्रमुख सौ. माधुरीताई अंतरकर, सौ. दाक्षयणीताई भालेकर, गुणवंत राठोड, आनंद वळसनकर व संगीताताई भदाडे यांचे प्रकल्प अध्यक्ष मा. प्रकाशजी लातूरे, उपाध्यक्षा डॉ. लिलाताई कर्वा, प्रकल्प कार्यवाह श्री. राजेशजी सुगरे, सहकार्यवाह श्री. उमेशजी सेलूकर, शालेय समिती अध्यक्षा श्री . सतीशजी कुलकर्णी , वसतिगृह समिती अध्यक्ष श्री. प्रशांतजी मेतकुटे, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर सोनटक्के, अधीक्षक दत्ता माने व सहअधीक्षक श्री. बाबासाहेब मते यांनी अभिनंदन करून कौतुक केले.

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **BAGWAN AMEERODDIN GULAMRASUL.** TO **BAGWAN AMIRODDIN GULAMRASUL**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the BAGWAN AMIRODDIN GULAMRASUL will used by my family husband /wife, children and relative.
**OLD NAME :-** BAGWAN AMEERODDIN GULAMRASUL.
**NEW NAME:-** BAGWAN AMIRODDIN GULAMRASUL.
**Address :-** LAL GODAUN, SHSHU CHOWK, LATUR, DIST. LATUR - 413512
AADHAR NO.- 820490889245
Mob. No.7385114056

टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
प्रिंटिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६